


# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२४८ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.५ डिसेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# उद्याला होणारी इंडिया आघाडीची बैठक पुढे ढकलली
# ममता-नितीश-अखिलेश यांच्या नकारानंतर खर्गेंचा निर्णय

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली: १**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी उद्या म्हणजेच ६ डिसेंबर रोजी दिल्लीत इंडिया आघाडीची बैठक बोलावली होती. मात्र आता ही बैठक पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बैठकीआधी इंडिया आघाडीत नाराजीचा सूर असल्याची चर्चा देखील रंगली होती.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमत्री अखिलेश यादव, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी बैठकीला उपस्थित राहण्यास नकार दिला होता. नितीश कुमार यांच्या जागी जेडीयूचे लल्लन सिंह आणि संजय झा आणि अखिलेश यांच्या जागी सपाकडून राम गोपाल यादव बैठकीला उपस्थित राहतील अशी अपेक्षा होती. मात्र, आता खर्गे यांनी ही बैठक पुढे ढकलली आहे.

**ममता बॅनर्जींची असमर्थता**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी देखील इंडिया आघाडीच्या बैठकीत अनुपस्थित राहण्याचे संकेत दिले आहेत. ममता बॅनर्जी यांनी या बैठकीला उपस्थित राहण्यास नकार देत 'इंडिया' आघाडीच्या बैठकीबाबत कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले. या बैठकीबाबत मला कोणीही सांगितले नाही किंवा मला फोन करूनही या संदर्भात माहिती देण्यात आली नाही. माझा उत्तर बंगालमध्ये ६ ते ७ दिवसांचा कार्यक्रम आहे. मी इतर योजना देखील केल्या आहेत. आता जर त्यांनी मला बैठकीसाठी बोलावले तर मी माझे कार्यक्रम कसे बदलता येईल?, असं म्हणत ममता बॅनर्जी यांनी असमर्थता दर्शवली आहे.




**भाजपाचा मुकाबला करण्यासाठी २६ पक्ष एकत्र**

लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजप आणि पंतप्रधान मोदींचा मुकाबला करण्यासाठी काँग्रेस, टीएमसी, आरजेडी, जेडीयू, आप, समाजवादी पार्टी, डीएमके असे २६ विरोधी पक्ष एकत्र आले आहेत. या विरोधी पक्षांच्या युतीला 'इंडिया' युती असे नाव देण्यात आले आहे. 'इंडिया' आघाडीची पहिली बैठक पाटणा येथे झाली. दुसरी बैठक बेंगळुरू येथे तर तिसरी बैठक मुंबईत झाली. यानंतर खर्गेंनी यांनी उद्या ६ डिसेंबर रोजी दिल्लीत चौथी बैठक बोलावली होती.

## इंडिया आघाडीच्या जागावाटप वाटाघाटीत आता असेल वेगळे चित्र

लोकसभा निवडणुकीत मध्य प्रदेश, कर्नाटक, गुजरात, राजस्थान, आसाम, छत्तीसगड, हरयाणा, उत्तराखंड, हिमाचल या राज्यांमधील १५२ मतदारसंघांमध्ये काँग्रेस-भाजप थेट लढत होईल. शिवाय महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश, झारखंड, पंजाब, दिल्ली या राज्यांतील २०२ मतदारसंघांत शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, जनता दल युनायटेड, राष्ट्रीय जनता दल, सपा, झामुमो, आप या मित्रपक्षांसोबत काँग्रेस उतरेल. काँग्रेसने भाजपविरुद्ध सरळ लढत होत असलेल्या मतदारसंघांमध्ये आपली संपूर्ण ताकद लावून जास्तीत जास्त जागा जिंकण्याचा प्रयत्न करावा आणि 'इंडिया' आघाडीत जागावाटपात अनावश्यक समस्या निर्माण करू नये, असे मत आता 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांचे नेते व्यक्त करीत आहेत.

# तीन राज्यांमधील मुख्यमंत्र्यांची नावं भाजपाकडून निश्चित?

**छत्तीसगडमध्ये समोर आणला नवा चेहरा : राजस्थानमध्ये मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत वसुंधरा राजे तर मध्यप्रदेश मध्ये शिवराज सिंह चौहान यांच्या नावाला पहिली पसंती**



**दि.५विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपाने दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयानंतर आता भाजपा या तीनही राज्यांत मुख्यमंत्रिपदासाठी कुणाची निवड करतो, याकडे सर्व राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलेलं आहे. सूत्रांकडून मिळत असलेल्या माहितीनुसार भाजपाच्या पक्षनेतृत्वाने तीन राज्यातील मुख्यमंत्रिपदासाठी नावं निश्चित केली आहेत. मात्र त्याबाबत अनेक तर्कवितर्कही लढवले जात आहेत. तसेच भविष्याचा विचार करून या तीनही राज्यांमध्ये उपमुख्यमंत्र्यांचीही नियुक्ती केली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आघाडीवर आहेत. पक्ष पुन्हा एकदा त्यांना संधी देऊ शकतो. तर मध्य प्रदेशमध्ये शिवराज सिंह चौहान यांच्या नावाला पहिली पसंती आहे, तसेच त्यांनाच पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदी संधी मिळेल, अशी शक्यता आहे. तर छत्तीसगडमध्ये केंद्रीय मंत्री रेणुका सिंह यांना मुख्यमंत्रिपद दिले जाण्याची शक्यता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सर्व नावांवर निर्णय झाला आहे. मात्र त्याबाबतची अधिकृत घोषणा होणे बाकी आहे.

भाजपाने २०२४ च्या लोकसभा निवडणुका विचारात घेऊन मुख्यमंत्र्यांची नावं निश्चित केली आहेत. तसेच पक्षश्रेष्ठींकडूनही या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. तसेच ही नावं निश्चित करताना पक्षाचं भविष्यातील नेतृत्व विचारात घेऊन तीन राज्यांमध्ये उपमुख्यमंत्रीही नियुक्त केले जाणार आहेत. त्यानुसार मध्य प्रदेशमध्ये शिवराज सिंह चौहान हे मुख्यमंत्रिपदी कायम राहतील. मात्र भविष्यातील नेतृत्व तयार करण्यासाठी दोन उपमुख्यमंत्र्यांचीही नियुक्ती करण्यात येऊ शकते. त्याचप्रमाणे राजस्थानमध्ये वसुंधरा राजे यांना मुख्यमंत्री बनवलं जाईल. तसेच इथेही दोन उपमुख्यमंत्री नियुक्त केले जातील. छत्तीसगडमध्ये रेणुका सिंह यांची मुख्यमंत्रिपदी नियुक्ती होईल. तर पक्ष तिथे एखाद्या अनुभवी नेत्याला उपमुख्यमंत्रिपदी नियुक्त करेल.

# अपात्रतेचा निकाल येण्यापूर्वीच एकनाथ शिंदेंनी पुढचा गिअर टाकला; संपर्क नेते, लोकसभा निरीक्षक नियुक्त्या जाहीर

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई १७**

डिसेंबर महिन्याअखेरीस विधानसभा अध्यक्षांकडून आमदार अपात्र प्रकरणावर निकाल येणार आहे. यामुळे राज्यातील वातावरण तापलेले आहे. असे असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी पुढचा गिअर टाकला आहे. शिंदे यांनी शिवसेनेचे राज्यातील संपर्क नेते आणि लोकसभा निरीक्षक नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.

शिंदे यांनी कोकण पट्टा, पश्चिम महाराष्ट्र वगळून उर्वरित ११ क्षेत्रांसाठी लोकसभा निरीक्षकांच्या नियुक्त्या केल्या आहेत. यानुसार राजेश पाटील -नंदुरबार, प्रसाद ढोमसे - धुळे, सुनील चौधरी - जळगाव, विजय देशमुख - रावेर, अशोक शिंदे - बुलढाणा, भूपेंद्र कवळी - अकोला, मनोज हिरवे - अमरावती, परमेश्वर कदम -



वर्धा, अरुण जगताप - रामटेक, अनिल पडवळ - नागपूर, आशिष देसाई - भंडारा-गोंदिया यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे. तर पश्चिम महाराष्ट्र सोडून कोकण पट्ट्यासह उर्वरित महाराष्ट्रासाठी विभागीय संपर्क नेत्यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. कोकण विभाग रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग जिल्ह्यांसाठी उदय सामंत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कोकण विभाग ठाणे, पालघरसाठी नरेश म्हस्के यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई विभाग मुंबई शहर, मुंबई उपनगरसाठी सिद्धेश कदम, किरण पावसकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तर मराठवाडा विभाग नांदेड, लातूर, हिंगोली, धाराशिवसाठी आनंदराव जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मराठवाडा विभाग जालना, संभाजीनगर, परभणी, बीडसाठी अर्जुन खोतकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्र विभाग नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, नगर जिल्ह्यांसाठी भाऊसाहेब चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# चैत्यभूमीवर उपलब्ध होणार 'जनता' चे खंड; भीम अनुयायांची झुंबड उडणार

## महापरिनिर्वाणदिनी डॉ. आंबेडकरांच्या अप्रकाशित साहित्याची अनुयायांना पर्वणी

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राज्य शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अप्रकाशित साहित्याचा आंबेडकर लेखन आणि भाषणे मालिकेतील २३ वा नवीन खंड, 'जनता' चे खंड ३ , १९३३ चा 'जनता खास अंक', इंग्रजी खंड २ चा मराठी अनुवाद (दोन भाग) इत्यादी नवीन ग्रंथ चैत्यभूमीवर विक्रीसाठी उपलब्ध केले आहेत. जनता खंड ४, ५ आणि ६ या खंडाचेही प्रकाशन होणार आहे. त्यामुळे बाबासाहेबांचे हे अप्रकाशित साहित्य मिळविण्यासाठी भीम अनुयायांची झुंबड उडणार आहे.

डॉ. आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाशी संबंधित अनेक अंक, विशेषांक, खास अंक आणि गौरव ग्रंथ प्रकाशित करण्यात आले आहेत. 'जनता' वृत्तपत्राचा १९३३ चा खास अंक प्रकाशित करण्यात आला होता. तो बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाशित झालेला पहिला अंक होता. या अंकाचे पुनर्प्रकाशन समितीने केले आहे तसेच



'जनता'चे ३ खंड प्रकाशित करण्यात आले आहेत.

काही वर्षांपासून डॉ. आंबेडकरांचे खंड प्रकाशित होत नव्हते. त्यामुळे अनेकांची नाराजी होती. परंतु डॉ. आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीने मागील अडीच वर्षांदरम्यान नवीन खंड २३, अनुवादित खंड २, खंड ६ आणि खंड १३ (दोन भाग), जनता ३-१, जनता ३-२ जनता ३-३, जनता खास अंक - १९३३ हे नवीन खंड प्रकाशित केले. त्याशिवाय इंग्रजी खंड ४,६,८,१०,१२,१५,१७ (तीन भाग),१८ (तीन भाग),सोअर्स मटेरियल खंड १ आणि जाती व्यवस्थेचे निर्मूलन या ग्रंथाच्या नवीन आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, समता,आणि जनता ही वृत्तपत्रे सुरू केली. यापैकी मूकनायक, बहिष्कृत भारत आणि समता ही पत्रे अल्पकाळातच बंद पडली. परंतु १९३० पासून सुरू झालेले 'जनता' हे वृत्तपत्र मात्र दीर्घकाळ चालले. बाबासाहेबांच्या मानवी हक्काच्या चळवळीचा दस्तऐवज म्हणजे 'जनता' चे खंड आहेत.

**- डॉ. प्रदीप आगलावे,**
**सदस्य सचिव, डॉ. आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती**

# खलिस्तानी दहशतवादी लखबीर सिंग रोडेचा मृत्यू, पाकिस्तानात होता लपून बसला

**दि.५विदर्भ प्रजसत्ताक कराची**

पाकिस्तानात लपून बसलेला खलिस्तानी दहशतवादी लखबीर सिंग रोडे याचा मृत्यू झाला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लखबीर सिंग रोडे याचे २ डिसेंबर रोजी पाकिस्तानात हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. लखबीर सिंग रोडे हा ७२ वर्षांचा होता. दरम्यान, लखबीर सिंग रोडे याच्या निधनाची बातमी लीक होऊ नये, यासाठी त्याच्यावर



पाकिस्तानात शीख प्रथेनुसार गुप्तपणे अंत्यसंस्कार करण्यात आले. लखबीर सिंग रोडे हा जर्नेलसिंग भिंद्रनवाले याचा पुतण्या होता.

लखबीर सिंग रोडे हा पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयच्या सांगण्यावरून पंजाबमध्ये भारताविरुद्धच्या दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी होता. तसेच, लखबीर सिंग रोडे हा खलिस्तान लिबरेशन फोर्स (घडत्र) आणि इंटरनॅशनल शीख युथ फेडरेशन (खडधत्र) या भारतातील प्रतिबंधित दहशतवादी संघटना पाकिस्तानमधून चालवत होता.

या वर्षी ऑक्टोबर महिन्यात पंजाबमधील राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) मोगाच्या कोठे गुरुपारा (रोडे) गावात छापा टाकला होता. त्यावेळी लखबीर सिंग रोडे याची मालमत्ता जप्त केली होती. बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायदा, १९६७ च्या कलम ३३ (५) अंतर्गत लखबीर सिंग रोडेवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. लखबीर सिंग रोडे पाकिस्तानात लपून बसला होता आणि त्याला आयएसआयचा पाठिंबा होता.

# तेलंगणाचा पुढचा मुख्यमंत्री कोण? रेवंत रेड्डींना काँग्रेसच्या अनेक आमदारांचा विरोध, आणखी दोन नावं चर्चेत

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक हेंद्राबाद**

तेलंगाणामध्ये सत्ताधारी बीआरएसला पराभवाचा धक्का देत काँग्रेसने दणदणीत विजय मिळवला आहे. एकीकडे मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये दारुण पराभव झाला असताना दक्षिण भारतातील या महत्त्वाच्या राज्यामध्ये विजय झाल्याने पक्षाला मोठा दिलासा मिळालेला आहे. मात्र आता तेलंगाणाचं मुख्यमंत्रिपद कुणाकडे सोपवावं या मुद्द्यावरून काँग्रेसमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे. मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीमध्ये रेवंत रेड्डी यांचं नाव आघाडीवर आहे. तेलंगाणामध्ये काँग्रेसला मिळालेल्या यशाचं श्रेय त्यांनाच दिलं जात आहे. मात्र आधी भाजयुमो आणि बीआरएसमध्ये असलेल्या रेवंत रेड्डी यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या मार्गात अनेक अडथळे आहे. काही काँग्रेस आमदार त्यांच्या नावाला विरोध करत असल्याची माहितीही समोर येत आहे.



मात्र सूत्रांकडून येत असलेल्या माहितीनुसार काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी रेवंत रेड्डी यांच्या नावाला सर्वाधिक पसंती आहे. एका सूत्राने सांगितले की, आम्ही पर्यवेक्षकांकडून सोपवण्यात येणाऱ्या रिपोर्टच्या आधारावर निर्णय घेणार आहोत. मात्र रेवंत रेड्डी मुख्यमंत्रिपदासाठी स्पष्टपणे आघाडीवर आहेत. रेवंत रेड्डी यांनी दोन मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. त्यातील एका मतदारसंघात त्यांचा विजय झाला. तर एका मतदारसंघात त्यांना पराभूत व्हावं लागलं होतं. दरम्यान, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे निवडणूक पर्यवेक्षकांचा अहवाल मिळाल्यानंतर त्यांच्याशी बोलून मुख्यमंत्रिपदाबाबत अंतिम निर्णय घेणार आहेत.

## संपादकीय ......

# पाच राज्यांच्या निकालाचा महाराष्ट्रावर काय परिणाम होणार?

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांकडे लोकसभेची सेमी फायनल म्हणून बघितलं जात होतं. देशाचा मूड काय आहे हे कळायला मदत होईल या अपेक्षेने सर्व पक्ष आणि कार्यकर्ते या निवडणुकांकडे बघत होते. रविवारी चार राज्यांचा निकाल लागला तर आज एका राज्याचा निकाल लागला. हिंदी पट्ट्यातील तीन राज्यात मोदी लाट कायम असल्याचं पक्कं झालं. या पाच राज्यांपैकी तेलंगणा आणि मिझोराममध्ये भाजपला गमावण्यासारखं काही नव्हतं. झाला तर फायदाच होणार होता. जो त्यांना झाला.. दोन्ही राज्यात त्यांनी आपली कामगिरी सुधारली. तेलंगणामध्ये केसीआर यांना हरवत काँग्रेसनं सत्ता मिळवली. तिथे भाजपनेही राज्य स्थापन झाल्यापासून सर्वात जास्त १४ टक्के मतं मिळवत आठ जागा जिंकल्या. मिझोराममध्ये ५ टक्के मतं मिळवत २ जागा जिंकल्या. पण भाजपचं सारं लक्ष राजस्थान, छत्तीसगड परत मिळवणं आणि त्याही पेक्षा जास्त लक्ष मध्यप्रदेश कायम राखण्याकडे होतं.

२०१८ पर्यंत या तिन्ही राज्यात भाजप सलग तीन तीन टर्म जिंकली होती पण त्या काळातल्या रमण सिंह, वसुंधरा राजे सिंधिया अशा मोठ्या नेत्यांवर अवलंबून न राहता भाजपने नवी टीम बांधण्यावरही भर दिला. भाजपच्या एकखांबी तंबुचा संपूर्ण प्रचार पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भोवती फिरत होता, तसा तो गेली ५-७ वर्षांपासून फिरतोय आणि त्याचा लाभही भाजपला होत आहे, ही वस्तुस्थिती सर्वांनीच मान्य केली आहे. या पाच राज्यांच्या निवडणुकीतही मोदींच्या देशप्रेमी, हिंदू धर्माभिमानी, विकासपुरुष छबीचा अत्यंत खुबीने वापर करण्यात आला. या प्रचारात काँग्रेसवर किंवा राहुल गांधीवर टीका होती पण त्यासोबत मोदी सरकारच्या कामाचा पाढा सुद्धा वाचला जायचा. विरोधक जात जनगणना, आरक्षणाच्या मुद्द्यावरुन रान पेटवत असताना, नरेंद्र मोदींनी आपण महिला, युवा, शेतकरी आणि गरीब या चार जातीच मानतो असं सांगत आपल्या मतदारांची मनं जिंकली.

या उलट काँग्रेसचा प्रचार मोदींभोवती जास्त काळ फिरता राहिला, मोदींवर टीका टीपण्णी करण्याच्या नादात, एन्टी कॅनवासिंगच्या नादात, मोदीविरोधी नॅरेटीव्ह सेट करण्याच्या नादात, आपली कामं, आपल्या स्ट्रेंग्थ मतदारांपर्यंत पोहोचवण्यात काँग्रेस पक्ष आणि काँग्रेस नेते या तीन राज्यात कमी पडले असं म्हणायला आता वाव आहे. त्यामुळे तीन राज्यातील मतदारांनी मोदींवर आणि भाजपवर पुन्हा विश्वास टाकला. चार महिन्यावर येऊन ठेपलेल्या लोकसभा निवडणूकीत मोदी लाट थोपवण्याचं काँग्रेस आणि मित्रपक्षांसमोरचं मोठं आव्हान आणखी कठीण झालं आहे. आपापसातले मतभेद दूर सारुन ते कशी रणनीती आखतात यावर ती लढत अटतटीची होणार की मोदी सहज विजयाची हॅटट्रिक साजरी करणार हे ठरेल.आता भाजपसोबत शिंदे गट आणि अजित पवार गट आहेत त्यामुळे २०२४ च्या विधानसभेसाठी मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करण्याची शक्यता कमीच दिसतेय. २०१४ सालचीच सेफ रणनिती महाराष्ट्रात वापरली जाईल अशी चर्चा सुरु झाली आहे.

# महापरिनिर्वाण दीन




महापरिनिर्वाण म्हणजे मृत्यूनंतरचे निर्वाण. महापरिनिर्वाण हे बौद्ध धर्माच्या अनेक मुख्य तत्वांपैकी एक आहे. यानुसार जो मनुष्य निर्वाण प्राप्त करतो तो सांसारिक आसक्ती, इच्छा आणि जीवनातील दुःखांपासून मुक्त राहतो. यासोबतच तो जीवन चक्रातूनही मुक्त राहतो. ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण (निधन) झाले. त्यानंतर त्यांचे पार्थिव मुंबईला राजगृहावर (दादर) आणण्यात आले. शिवाजी पार्क येथील समूद्रकिनारी असलेल्या स्मशान भूमीमध्ये ७ डिसेंबर १९५६ रोजी १२ लाख अनुयायांसमक्ष त्यांच्यावर बौद्ध पद्धतीने अंतिम संस्कार करण्यात आला. त्यावेळी स्मशान भूमी एवढीच त्या जागेची ओळख होती. काही वर्षांनी आंबेडकरांच्या पवित्र अस्थीवर चैत्य उभारण्यात आले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना श्रद्धांजली व आजरांजली अर्पण करण्याकरिता भारताच्या सर्व प्रांतातून लाखोंच्या संख्येचा मोठा बौद्ध जनसमूदाय मुंबई येथील चैत्यभूमी (दादर) शिवाजी पार्क येथे दरवर्षी १ डिसेंबर पासून येत असतो. या जनसमूदायांची काळजी बृहन्मुंबई महानगरपालिका व आंबेडकरवादी स्वयंसेवक-स्वयंसेविका मोठ्या परिश्रमपूर्वक घेत असतात. दरवर्षी येणाऱ्या श्रद्धावान अनुयायांची गर्दी प्रचंड प्रमाणात वाढतच असते. २५ लाख अनुयायी बाबासाहेबांच्या अस्थिचे दर्शन घेण्यासाठी व त्यांना अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमीवर येत असतात. डॉ. आंबेडकरांचे अनुयायी-विचारवंत तसेच देश-विदेशातील जनतेकरिता हे चैत्यभूमी स्मारक प्रेरणास्थान आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्मृती अव्याहतपणे जपण्यासाठी दादरच्या चैत्यभूमीवर अखंडपणे तेवणारी भीम ज्योत उभारण्यात आली आहे. यासाठी मुंबई महापालिकेला साडे २१ लाख रुपये खर्च आला. ११ सप्टेंबर २०१९ रोजी या भीमज्योतीचे अनावरण करण्यात आले ही भीमज्योत सव्वा आठ फूट उंच आणि साडेसात फूट रुंद आहे. तेवणाऱ्या ज्योतीचा भाग बिडाच्या धातूपासून बनवण्यात आला आहे. आठ मिलीमीटर काचेच्या आवरणाआड ही ज्योत सतत तेवत राहिल. या ज्योतीला महानगर गॅसतर्फे २४ तास अखंड गॅस पुरवठा केला जाईल. गौतम बुद्धांचा, 'अत्त दीप भव' म्हणजेच स्वयंप्रकाशित व्हा हा प्रेरणादायी संदेश वेगळ्या अर्थाने अनुयायांना देण्यासाठी ही भीमज्योत उभारण्यात आली आहे. याच्या तीन महिन्यांपूर्वी राज्य सरकारने अखंड प्रज्वलित राहणारी देशातील पहिली भीमज्योत मुंबईतल्या ओव्हल मैदान परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर बसवण्यात आली होती. दुसरी अखंड भीमज्योत ही दादर येथील चैत्यभूमी परिसरातील आहे.बाबासाहेब डॉ भीमराव रामजी आंबेडकर हे विद्वान, समाजसुधारक आणि भारतातील सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी आपले जीवन समर्पित करणारे नेते होते. त्यांनी समानतेचा भारत स्थापन केला, एक देश ज्याने ऐतिहासिकदृष्ट्या वंचित असलेल्या लोकांना मोठ्या संधी उपलब्ध करून दिल्या .१९५० च्या दशकात महिलांच्या शिक्षणाच्या अधिकारासाठी लढा देणारे हिंदू कोड बिल पारित करण्यात डॉ. आंबेडकरांचे महिलांच्या हक्कांसाठीचे योगदान होते. बाबासाहेब हे स्त्री शिक्षणाचे अग्रगण्य पुरस्कर्ते होते. २० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे केलेल्या भाषणात आंबेडकर म्हणाले, मी समाजाच्या प्रगतीचे मोजमाप महिलांनी केलेल्या प्रगतीच्या प्रमाणात करतो, अशा प्रकारे समाजात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होण्याचे संकेत दिले आणि त्याची प्रगती शिक्षणावर अवलंबून असल्याचे अंतर्दृष्टी दाखवते. महिलांसाठी.

बाबासाहेबांचा खरा विश्वास होता की शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे हत्यार आहे, विशेषतः दलित समाजासाठी. ज्ञान मुक्त आणि प्रवेशयोग्य बनवण्याच्या डॉ. आंबेडकरांच्या अग्रगण्य दृष्टीचे वास्तविक जीवनातील मूर्त स्वरूप भारतीय राज्यघटनेच्या कलम ४५ मध्ये समाविष्ट केले आहे जे आज सर्व भारतीयांना जात किंवा लिंग विचारात न घेता मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची परवानगी देते. डॉ. आंबेडकरांच्या उल्लेखनीय विद्वत्तापूर्ण प्रशंसेने हे सिद्ध केले की ते केवळ आजीवन शिकणारेच नव्हते तर एक कुशल शिक्षक आणि ज्ञान देणारे देखील होते.

डॉ. बाबासाहेबांच्या विचारांमध्ये अभ्यासक्रम हा सर्वात उल्लेखनीय विचार आहे. त्याला असे वाटले की विद्यार्थ्यांना तथ्य आणि मताच्या बाबी यांच्यात फरक करणे शिकण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे. अभ्यासक्रमाने विद्यार्थ्यांना प्रत्येक गोष्टीवरीत्यभूमी या पवित्र स्थळाला भारतातील दलित चळवळीसाठी खूप महत्त्व आहे. येथेच ६ डिसेंबर १९५६ रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून गौरवले जाणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉ. आंबेडकरांनी जातीय अत्याचाराच्या साखळ्या तोडण्यासाठी, प्रज्वलित करण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. समाजाच्या पायाला आव्हान देणारी क्रांती.ल प्रश्न निष्पक्षपणे (सहानुभूतीने) मांडण्यास सक्षम केले पाहिजे. ते एखाद्या प्रस्तावित कल्पनेचे विश्लेषण करण्यास सक्षम असले पाहिजेत आणि ते स्वीकारण्याआधी आणि नाकारण्याआधी काय येते याचे निरीक्षण करू शकतात, अशा प्रकारे पुरोगामी आणि वैज्ञानिक कल्पनांना समर्थन देतात.भूतकाळाला वर्तमानाशी जोडणारा हा एक महत्त्वाचा क्षण आहे, जो बदलत्या भारतावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेचा शाश्वत प्रभाव दाखवतो.अशा या विश्वरत्न क्रांतीसुर्य शिल्पकार संविधान निर्माते इतिहासकार विश्वभूषण बोधिसत्व दलितांचा दाता. महामानवाला त्रिवार त्रिवार अभिवादन



**डॉ .धनराज चक्रे**
**अमरावती**

# 'जिजाऊ'त ८६ तर 'महात्मा फुले'साठी ३५ नामांकन

## अर्जाची माघार २० डिसेंबर पर्यंत

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** :सहकार विभागात सध्या निवडणुकांची धुमशान सुरू आहे. यामध्ये जिजाऊ कमर्शिअल को- ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक पदांसाठी ८६ तर महात्मा फुले अर्बन को- ऑपरेटिव्ह बँकेसाठी ३५ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहे. याशिवाय सहा तालुक्यातील खरेदी-विक्री संघांसाठी जानेवारी २०२४ मध्ये निवडणूक होणार असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी सोमवारी दिली.

### नामनिर्देशनपत्रांवर आक्षेपाकडे लक्ष

जे उमेदवार महसूल कायदा अधिनियम १९६० नियम २९६१ प्रमाणे अन्वये कलम (७३ एफएफ जुनी) ७३ सीए (७३ क अ) उल्लंघन करतील अशांच्या नामनिर्देशनपत्रावर आक्षेप असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी शंकर कुंभार हे कोणता निर्णय घेतात? याकडे सहकार क्षेत्राच्या दिग्गजांच्या नजरा लागल्या आहेत,



जिजाऊ बँकेसाठी ४ डिसेंबर हा उमेदवारी अर्जासाठी शेवटचा दिवस होता. या कालावधीत सर्वसाधारण म मतदारसंघात ५४. महिला राखीव १३. अनु जाती-जमाती प्रवर्ग ५. विमुक्तजाती-जमाती, विशेष मागास प्रवर्ग ३ व नागरिकांच्या मागास प्रवर्गात ११ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले आहेत, १५ संचालक पदांसाठी ही निवडणूक होत न आहे. यामध्ये सर्वसाधारण मतदारसंघात १० व राखीवमध्ये ५ ३. संचालक पदे आहेत. अर्जाची छाननी ५ न डिसेंबरला व उमेदवारी अर्जाची माघार २० डिसेंबरपर्यंत होणार आहे व त्यानंतर लढतीचे चित्र स्पष्ट होईल. याशिवाय महात्मा फुले अर्बन को- ऑपरेटिव्ह बँकेसाठी ३५ उमेदवारी अर्ज दाखल झालेले आहेत. या बँकेमध्ये १७ संचालक पदांराठी निवडणूक होत आहे. यामध्ये १२ पदे सर्वसाधारण प्रवर्ग तर ५ संचालक पदेराखीव प्रवर्गात आहेत. प्रक्रियेदरम्यान अनु, जाती-जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व व्हीजेएनटी प्रवर्गात प्रत्येकी एक अर्ज दाखल झाला असल्याने हे उमेदवार बिनविरोध निवडले गेल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रत्यक्षात त्यांच्या विजयाच्या घोषणेची औपचारिकताच बाकी आहे.

# जिल्हा न्यायालयांत ४६२९ पदांसाठी भरती

## 'या' तारखेपर्यंत करता येणार अर्ज

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** राज्य शासनाच्या ४३ विभागांतर्गत पावणेतीन लाखांहून अधिक पदे रिक्त आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घोषणेनुसार ७५ हजार पदांची भरती केली जाणार आहे. राज्यात सत्ताबदलानंतर शिंदे- फडणवीस सरकारने मेगाभरतीची घोषणा केली होती. कालबद्ध पद्धतीने १५ ऑगस्ट २०२३ पूर्वी भरती पूर्ण करण्याचेही जाहीर केले होते. २० ऑक्टोबर २०२२ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट- ब, क आणि गट- ड पदभरतीसाठी टीसीएस, आयबीपीएस या कंपन्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय झाला. विविध पदांच्या जाहिराती आल्या असून भरतीही पूर्ण झाली आहे. त्यानंतर आता जिल्हा न्यायालयामधील विविध पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध झाली आहे.




जिल्हा न्यायालय भरती २०२३ जाहीर झाली आहे. सदर भरतीची तपशीलवार अधिसुचना जाहीर करण्यात आली.

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील लघुलेखक, कनिष्ठ लिपिक, शिपाई/हमाल या संवर्गातील ४६२९ पदांसाठी सदर भरतीसाठी इच्छुक व पात्र उमेदवार ४ डिसेंबर ते १८ डिसेंबरपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करू शकतात. जिल्हा न्यायालय भरती २०३ अंतर्गत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील लघुलेखक, कनिष्ठ लिपिक, शिपाई/हमाल या पदांसाठी भरती करण्यात येणार आहे. या बाबतची तपशीलवार अधिसूचना ४ डिसेंबर रोजी जाहीर झाली आहे. पदांची नावे- लघुलेखक, कनिष्ठ लिपिक, शिपाई/हमाल ही असून अर्ज करण्यास अधिकृत संकेतस्थळ http://www.bombayhighcourt.nic.in हे असून यावर अर्ज करावे असे आवाहन करण्यात आले आहे.




# कॅल्शियम हवं ५ पदार्थ खा- कॅल्शियम मिळेल भरपूर, फॅक्चरचा टळेल धोका

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक** - रोजची दगदग-कामासाठी धापवळ यामुळे शरीराला थकवा येतो. थकवा कमी करण्यासाठी शरीराला आयर्न, प्रोटीन्स यांसारख्या पोषक तत्वांची आवश्यकता असते. कॅल्शियम असे एक मिनरल आहे हे हाडांच्या आणि दातांच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. याव्यतिरिक्त ब्लड क्लॉट, नर्व्हस सिस्टीमध्ये सुधारणा, हार्ट रेट नॉर्मल करण्यासाठीही साहाय्यक ठरते. शरीरात जवळपास ९९ टक्के कॅल्शियम हाडांमध्ये जमा असते. १ टक्का कॅल्शियम मांसपेशींमध्ये असते.

**शरीरात कॅल्शियम कमी असेल तर काय होते?**-कॅल्शियमच्या कमतरतेने हाडं कमकुवत होतात आणि ऑस्टिओपेरोसिससारखो आजार उद्भवू शकतात. इतकंच नाही तर कॅल्शियमच्या कमतरतेमुळे दातांच्या समस्या, रक्त कमी होणं, नखं कमकुवत पडणं, एकाग्रता कमी होणं असे त्रास उद्भवतात. कॅल्शियम दूधासह इतर डेअरी उत्पादनांमध्ये मोठ्या प्रमाणात असते. पण रोजच्या जेवणातील भाज्याही तुम्हाला कॅल्शियम देऊ शकतात. बऱ्याच जणांना हे दूध प्यायलाही आवडत नाही. हिवाळ्याच्या दिवसांत कॅल्शियमयक्त भाज्यांचा समावेश केल्यास हाडांचे त्रास टळतील, सांधेदुखीच्या समस्या उद्भवणार नाहीत.

हार्वर्ड हेल्थनुसार १९ ते ५० वर्षवयोगटातील महिलांना रोज १००० मिलीग्राम कॅल्शियमची आवश्यकता असते. तर ५० वर्षांपुढील वयोगटातील महिलांना १२०० मिलीग्राम कॅल्शियमची आवश्यकता असते. १९ ते ५० वर्ष वयोगटातील पुरूषांना १००० मिलीग्राम कॅल्शियमची आवश्यकता असते. फक्त डेअरी प्रोडक्ट्स नाही तर शेंगा, ड्रायफ्रुट्स आणि स्टार्चयुक्त भाज्यांमध्येही मोठ्या प्रमाणात कॅल्शियम असते.

**केल आणि ब्रोकोली**- केल आणि




ब्रोकोली कॅल्शियमच्या उत्तम स्त्रोतांपैकी एक आहे. एक कप कच्च्या ब्रोकोलीमध्ये ४३ मिलीग्राम कॅल्शियम असते तर १ कप केलमध्ये ५३ मिलीग्राम कॅल्शियम असते.

**कोलार्ड ग्रीन्स**-कोलार्ड ग्रीन्समध्ये जवळपास ३५ मिलिग्राम कॅल्शियम असते. सॅलेडच्या स्वरूपात तुम्ही ही भाजी खाऊ शकता. यात आयर्नचे प्रमाणही भरपूर असते.

**भेंडी**- भेंडीची भाजी अनेकांना आवडत नाही पण ही भाजी कॅल्शियमचा चांगला स्त्रोत आहे. भेंडीच्या भाजीत जवळपास ६५ मिलीग्राम कॅल्शियम असते.

**किव्ही**- हाय कॅल्शियम फूड्समध्ये किव्ही सगळ्यात वर आहे. नियमित किव्ही खाल्ल्याने शरीराला कॅल्शियमची कमतरता जाणवत नाही आणि हाडं मजबूत राहतात. यात व्हिटामीन सी मोठ्या प्रमाणात असते.

**बेरीज**- जांभूळ, ब्लॅकबेरी, स्ट्रॉबेरी कॅल्शियमचा चांगला स्त्रोत आहेत. तुम्ही या भाज्या सॅलेडच्या स्वरूपात खाऊ शकता. यात २० मिलीग्रामपेक्षा जास्त कॅल्शियम असते.

# व्हॉलीबॉल अजिंक्यपद स्पर्धा व वरिष्ठ पुरुष संघाची निवड चाचणी

## अमरावती जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनचे आयोजन

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**- दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन द्वारा होणाऱ्या ५४ वी वरिष्ठ राज्य व्हॉलीबॉल स्पर्धा,बदलापूर जिल्हा ठाणे येथे दिनांक २१ ते २४ डिसेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आली आहे.या स्पर्धेमध्ये खेळाडूंनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा असे आवाहन अमरावती जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन द्वारे करण्यात आले आहे.

अमरावती जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन दिलेल्या माहितीनुसार,सदर स्पर्धेत भाग घेण्यासाठी अमरावती जिल्हा वॉलीबॉल असोसिएशन तर्फे जिल्हा अजिंक्यपद वॉलीबॉल स्पर्धा घेण्यात येणार आहे.या स्पर्धेतून अमरावती जिल्हा व्हॉलीबॉल संघाची निवड केली जाईल.या स्पर्धेमध्ये अमरावती जिल्ह्यातील खेळाडूंचा सहभाग अनिवार्य राहील. दिनांक १० डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ०९ ते सायंकाळी ०५ पर्यंत शहरातील अंबापेठ क्रीडा मंडळ अमरावती येथे ही निवड चाचणी होणार आहे.येणाऱ्या खेळाडूंनी आपण ज्या मैदानात म्हणजेच मंडळात खेळत असाल त्या मैदानावरील वरिष्ठ खेळाडूंची पत्र व स्वतःच्या आधार कार्ड सोबत आणणे अनिवार्य आहे.

सदर स्पर्धेमध्ये खेळाडू अमरावती जिल्ह्यातील असावा बाहेरील खेळाडूला स्पर्धेत प्रवेश राहणार नाही.स्पर्धा रोटेशन पद्धतीने राहतील. स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूची अमरावती जिल्हा व्हॉलीबॉल संघात निवड करण्यात येईल.

अशी माहिती अमरावती जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन द्वारे देण्यात आलेली आहे.सदर स्पर्धेमध्ये व्हॉलीबॉल खेळाडूंनी जास्तीत जास्त संख्येत सहभाग नोंदवावा असे आवाहन असोसिएशन तर्फे करण्यात आले आहे.

सदर स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविण्याकरिता अमरावती जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे सचिवमनीष जोशी ९४ २२ १५ ६७ ४३ प्रतीक ठाकरे ९४ ० ३ ० ५५ ७६ धीरजपाल ९४ ० ३ ८८ ४३ ३३ निखिल राऊत ७७ ९८ २० ४२४९यांच्याशी संपर्क साधावा.



# सिंधुताई सपकाळांचा वारस होण्याचा खासगी सचिवाचा प्रयत्न

## सिंधुताईंचे पुत्र अरूण सपकाळ यांचा आक्षेप

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** दिवंगत सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ यांच्या खासगी सचिवाने स्वत:च्या नावामागे सिंधुताईंचे नाव लावून त्यांचा वारस होण्याचा प्रयत्न चालवला आहे, असा आक्षेप सिंधुताई सपकाळ यांचे पुत्र अरूण सपकाळ यांनी घेतला आहे. या प्रकरणी त्यांनी अचलपूर येथील न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

सिंधुताई सपकाळ यांचे खासगी सचिव विनय नितवणे हे पुण्यातील संस्थेचा कारभार पाहतात. सिंधुताई सपकाळ यांचे ४ जानेवारी २०२१ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर विनय नितवणे यांनी स्वत:च्या नावात बदल करून राजपत्राद्वारे नावामागे सिंधुताई सपकाळ यांचे नाव लावले आहे. जी मुले अनाथ आहेत, अशाच मुलांच्या नावांमागे सिंधुताई सपकाळ यांचे नाव लावले जाते. मात्र, विनय नितवणे हे अनाथ नाहीत, तरीही त्यांनी आपल्या आईचे नाव लावले आहे. त्यांच्या नावाचा दुरूपयोग होण्याची शक्यता असल्याने आपण न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय घेतला, असे अरूण सपकाळ यांनी सांगितले.

विनय नितवणे यांनी सिंधुताई सपकाळ यांच्या संस्थेत काम करावे, समाजकार्य करावे, यासंदर्भात आमचा कुठलाही आक्षेप नाही. मात्र ते अनाथ असताना त्यांनी स्वत:च्या नावामागे सिंधुताईंचे नाव लावले, यावर तीव्र आक्षेप असल्याचे अरूण सपकाळ म्हणाले. विनय नितवणे हे सिंधुताईंसोबत रहायचे. सिंधुताईंमुळे त्यांच्या अनेकांशी ओळखी झाल्या आहेत. आता सिंधुताईंचे नाव लावून विनय नितवणे यांना नेमके काय साध्य करायचे आहे, असा प्रश्न देखील अरूण सपकाळ यांनी उपस्थित केला आहे.

या प्रकरणी सर्वात आधी आपण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. यावर उच्च न्यायालयाने आधी खालच्या न्यायालयात याचिका दाखल करावी, असे स्पष्ट केल्यावर आता अचलपूर येथील न्यायालयात याचिका दाखल केली आहे, असे अरूण सपकाळ यांनी सांगितले. अरूण सपकाळ हे चिखलदरा येथे सिंधुताई सपकाळ यांनी स्थापन केलेल्या अनाथ मुलींच्या आश्रमाची व्यवस्था पाहत आहेत.

सिंधुताई सपकाळ यांच्या नावाचा गैरवापर करून अनेकांनी फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपण पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात देखील तक्रार दाखल करणार असल्याचे अरूण सपकाळ यांनी सांगितले.

### गैरसमजातून झालेला प्रकार

सिंधुताई सपकाळ यांचे नाव लावल्यावरून अरूण सपकाळ यांनी आपल्यावर घेतलेला आक्षेप हा गैरसमजातून घडलेला प्रकार आहे. हा केवळ कौटुंबिक वाद आहे. मी लहानपणापासून सिंधुताई सपकाळ यांच्यासोबत आहे. मी सिंधुताईंचे नाव लावल्याने अरूण सपकाळ हे नाराज झाले. ही नाराजी लवकरच दूर होईल, असे स्पष्टीकरण दिवंगत सिंधुताई सपकाळ यांचे खासगी सचिव विनय नितवणे यांनी दिले आहे.



## मनोज जरांगेंच्या आणखी एका सभेच्या आयोजकांवर गुन्हा दाखल

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे महाराष्ट्राचा दौरा करत असून, ठिकठिकाणी त्यांचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. तर, आपल्या कार्यक्रमाच्या आयोजकांवर गुन्हे दाखल केले जात असल्याचा आरोप जरांगे यांनी केला होता. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मनोज जरांगे यांच्या अशाच एका कार्यक्रमाच्या आयोजकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कन्नड शहरातील भारुका नगर येथील गिरणी ग्राऊंड झालेली सभा वेळेत झाली नसल्याने पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी या प्रकरणी संतोष त्र्यंबकराव निळ, संतोष नामदेव पवार, मनोज आण्णासाहेब देशमुख, राजेंद्र साहेबराव चव्हाण व बाळु आल्हाड पाटील, सदाशिव दगडू पाटील (सर्व रा. कन्नड ता कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. संध्याकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत सभेचा वेळ असतांना, ही सभा रात्री १२ वाजून ४ मिनिटाला सभा संपल्याचा आरोप करण्यात आला आहे. दिलेल्या परवानगीचे व नियम अटींचे उल्लंघन, तसेच जिल्हाधिकारी यांचे आदेशाचे उल्लंघन करुन सभेच्या सभोवतालच्या परीसरात राहण्यास असणाऱ्या नागरी वसाहतीतील नागरिकाना उपद्रव होईल अशा प्रकारे ध्वनी क्षेपकाचा वापर केल्याचा आरोप करत हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निसर्गाच्या प्रकोपाने त्रस्त, अखेर शेतकऱ्याने पऱ्हाटी उपटली, लावली होती २ एकरात

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक तिवसा,** नैसर्गिक प्रकोपामुळे शेतकर्यांचे अतोनात नुकसान झाले. अळीचा प्रादुर्भाव व अवकाळी पावसामुळे कापसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे २ एकरातील उभे पर्हाटीचे पीक अखेर शेतकर्याला उपटून काढावे लागल्याची वेळ आली आहे. शेंदुरजना बाजार येथील प्रदीप घुरडे असे नुकसानग्रस्त युवा शेतकर्याचे नाव आहे. हजारो रुपये खर्च करून उभे केलेल्या पर्हाटी पिकांवर अचानक काही महिन्यांपूर्वी निसर्गाचा प्रकोप झाला. पावसाच्या पाण्याने चक्क पर्हाटीचे पीक खरडून गेल्याने पीक तर उभे झाले मात्र शेतकर्याला अपेक्षित असे उत्पन्न पदरात न पडल्याने अखेर शेतकरी प्रदीप घुरडे यांनी त्यांच्या शेतातील २ एकरातील उभी पर्हाटी मजुरांच्या हाताने उपटून फेकून संताप व्यक्त केला आहे. नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या अशा नुकसानग्रस्त शेतकर्यांना शासनाने मदत करण्याची मागणी करण्यात येत आहे. याबाबत तरुण भारतशी बोलताना शेतकरी प्रदीप घुरडे म्हणाले की, आधीच कापसाला भाव नाही अन् त्यात हा नैसर्गिक प्रकोप. अपेक्षित उत्पन्न होईल ही आशा दिसत नव्हती. अखेर पर्हाटी उपटावी लागली. शासनाने योग्य ती दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकर्यांना मदत करावी व त्यांच्या शेतमालाला योग्य तो भाव द्यावा हीच अपेक्षा आहे.



## सुटीच्या दिवशीही जिल्हा परिषदेत कामकाज राहणार सुरू

### अधिवेशन काळात अलर्ट राहण्यासाठी डेप्युटी सीईओंच्या सूचना

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** राज्याचे हिवाळी अधिवेशन येत्या ७ तारखेपासून सुरू होत आहे. अधिवेशनादरम्यान अनेक तातडीची माहिती तसेच कागदपत्रे मागवले जातात. त्यांची पूर्तता आणि कामाची विभागणी करण्यासाठी नेहमीप्रमाणे कार्यालयात संध्याकाळी ७:३० वाजेपर्यंत तसेच शनिवारच्या शासकीय सुटीच्या दिवशी जिल्हा परिषद सुरू ठेवण्याचा निर्णय जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा यांच्या मार्गदर्शनात सामान्य प्रशासन विभागाचे डेप्युटी सीईओ डॉ. कैलास घोडके यांनी घेतला आहे. तसेच विभागप्रमुखांनीही मुख्यालय सोडण्यापूर्वी पूर्वपरवानगी घेण्याबाबत आदेश काढले आहेत.

राज्याचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे येत्या ७ डिसेंबरपासून सुरू होत आहे.

या अधिवेशनादरम्यान अनेक प्रश्नांची उत्तरे मागविण्यासाठी संबंधित




मंत्रालयाचे अधिकारी स्थानिक पातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थांना संपर्क करतात. वास्तविक काही वेळा सुटी असल्याने उत्तरे मिळत नाहीत, याशिवाय तसेच सुटीच्या दिवशी मंत्री व अधिकारी यांचे दौरेही जिलह्यात असतात. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाचे डेप्युटी सीईओंनी शनिवारच्या शासकीय सुट्या रद्द केल्या आहेत व कार्यालय सुटण्याच्या वेळपेक्षा अर्धा तास मुख्यालयात थांबावे, अशा सूचना दिल्या आहेत.

नागपूर येथे हिवाळी अधिवेशन येत्या गुरुवारपासून सुरू होत आहे. अधिवेशनादरम्यान अनेक प्रश्नांची उत्तरे मागविली जातात. ज्या ज्या विभागाचे संबंधित प्रश्नांच्या अनुषंगाने विधिमंडळाने माहिती मागविली आहे. ती माहिती तसेच वेळेवर लागणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने खातेप्रमुख, कर्मचारी यांनी अधिवेशन कालावधीत मुख्यालय सोडू नये, तसेच सुटीच्या दिवशी कार्यालयात हजर राहावे, अशा सूचना सर्व विभागप्रमुखांना दिल्या आहेत.

**– डॉ. कैलास घोडके,** डेप्युटी सीईओ सामान्य प्रशासन विभाग जि. प.

## चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, यवतमाळ आणि गोंदियात जोरदार पावसाचा अंदाज

### मिचौंग चक्रीवादळाचा परिणाम

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक पुणे :** मिचौंग चक्रीवादळाचा परिणाम म्हणून पूर्व विदर्भात मंगळवार आणि बुधवारी वादळी वारे, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस होण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मिचौंगचे या चक्रीवादळाचे सोमवारी सकाळी साडेआठ वाजता तीव्र चक्रीवादळात रुपांतर झाले आहे. चक्रीवादळ सकाळी साडेसाठ वाजता चेन्नईपासून ईशान्य दिशेला ९० आणि नेल्लोरपासून आग्नेय दिशेला १५० किमीवर अंतरावर होते. तीव्र चक्रीवादळात रुपांतर झाल्यानंतर ते ८५ ते १०५ किमी प्रती तास वेगाने किनाऱ्याकडे झेपावत आहे. तीव्र चक्रीवादळ उद्या दुपारी नेल्लोरच्या जवळ बापटला येथे धडकण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळाचा परिणाम म्हणून राज्यात आद्रर्ततेचे प्रमाण वाढणार आहे. प्रामुख्याने विदर्भ आणि मराठवाड्यात ढगाळ वातावरण निर्माण होऊन किमान तापमानात वाढ होईल. तसेच पुढील चार दिवस राज्यात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज आहे. मंगळवार आणि बुधवारी पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, यवतमाळ आणि गोंदियात वादळी वारे, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस होण्याचा अंदाज आहे. गुरुवारी, सात डिसेंबरनंतर मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात हवामान कोरडे होण्यास सुरुवात होईल. या काळात कोकण किनारपट्टीवरही हवामान कोरडे राहून किमान तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने घट होईल, अशी शक्यताही हवामान विभागाने व्यक्त केली आहे.




## डॉ. रवि व स्मिता कोल्हे यांना पुरस्कार

### सीएसआर एक्सीलेंस अवॉर्ड, ९ डिसेंबरला मुंबईत सन्मान

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक धारणी,** आंतरराष्ट्रीय स्तरावर जनसेवेसाठी आणि आपल्या कर्तव्यक्षेत्रात अद्वितीय कार्य करणार्यांना देण्यात येणारा सीएसआर जनरल एक्सीलेंस अवॉर्ड–२०२३ मेळघाटातील पद्मश्री डॉ. रवि तथा डॉ. स्मिता कोल्हे यांना घोषित करण्यात आल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हिंदीचे प्रख्यात कवी कुमार विश्वास, क्रिकेट स्टार युवराज सिंग, महिला क्रिकेटर मिताली राऊत आणि प्रसिद्ध पॅडमॅन अरुणाचलम मुरुगानाथम या आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त प्रतिष्ठितांना सुद्धा हा अवार्डप्रदान करण्यात येत आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देशाचे रक्षामंत्री राजनाथसिंग पुरस्कार प्रदान करतील. ९ डिसेंबर रोजी मुंबईत स्टॉक एक्सचेंजच्या ऐतिहासिक इमारतीमध्ये सोहळा आयोजित करण्यात आला आहे. मेळघाटात कुपोषण काळापासून डॉ. रवि कोल्हे तथा स्मिता कोल्हे यांचे सामाजिक कार्य विशेष रुपाने प्रकाशझोतात आलेले होते. त्यांच्या जनसेवेच्या कार्याची दखल केंद्र शासनाने घेत पद्मश्री पुरस्कार दिला होता. आंतरराष्ट्रीय स्तराचे कवी कुमार विश्वास आणि क्रिकेटपटू युवराज सिंग यांना सुद्धा सीएसआर अवॉर्ड प्रदान करण्यात येत आहे. मेळघाटातील सार्वजनिक आरोग्यावर काम केल्यानंतर आता मेळघाटातील शेतीवर कोल्हे काम करीत आहेत. परंपरागत पिकांऐवजी फळ लागवडीसह विविध पिकांबद्दल नवनवीन प्रयोग ते करीत आहेत. अनेक राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त कोल्हे दाम्पत्यास नवीन सीएसआर अवॉर्ड मिळत असल्याने मेळघाटसह संपूर्ण विदर्भात त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## कुऱ्हा येथील शेतशिवारात जुगार खेळणाऱ्या सहा जुगाऱ्यांना अटक

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:** शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुऱ्हा येथील शेतशिवारात जुगार खेळणाऱ्या सहा जुगाऱ्यांना अटक करण्यात आली. तर चौघे जण पसार होण्यास यशस्वी झाले. ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २ डिसेंबर रोजी ही कारवाई केली. आरोपींकडून पाच मोटर सायकल, पाच मोबाईल व नगदी ३५३०० रुपये व जुगार साहित्यासह एकूण २ लाख ९८ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अटक जुगाऱ्यांमध्ये शेख मोसम शेख बशीर (२५, करजगाव), अमित रूपराव डवरे (२४), गफ्फार बेग मेहमूद बेग (४२), दीपक संजय नवले (३०, सर्व. रा. कुऱ्हा), अमोल पांडुरंग कुसटकर (२८, रा. तळेगाव) तथा किसन रामरावजी बोबडे (५०, रा. लाखनवाडी) यांचा समावेश आहे. तर रवींद्र मानकर (रा. करजगाव), मोहन खरे, प्रकाश बोरवर (दोघेही रा.कुऱ्हा) व योगेश वानखडे (रा.कांडली अंबाडा) हे फरार झालेत. कुऱ्हा ते कोंडवर्धा रोडवरील शेतशिवारात सार्वजनिक ठिकाणी तो जुगार भरविला गेला होता.

**यांनी केली कारवाई –**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरिक्षक सचिन पवार, अंमलदार, युवराज मानमोठे, स्वप्निल तंवर, रविन्द्र वऱ्हाडे, सागर नाठे, गेठे यांनी ही कारवाई केली. आरोपींना शिरजगाव कसबा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

## युद्धच्या पार्शवभूमीवर सैनिकांच्या मनाची अवस्था साकारणारे मजार

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** ६२ व्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धे मधे अमरावती केंद्रावरील प्राथमिक फेरीत दि. ४ डिसेंबर,रोजी इरफान मुजावर लिखित आणि अभिजित देशमुख दिग्दर्शीत *मजार* नाटक सादर करण्यात आले. अमरावती मधे सुरु असलेल्या या प्राथमिक फेरीला आजही रसिकांची लक्षणीय उपस्थिती होती.

सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि संचालक सांस्कृतिक कार्य बिभीषण चावरे यांचे मार्गदर्शनात स्पर्धेची ही प्राथमिक फेरी संपूर्ण महाराष्ट्रात सुरु असून या मालिकेत आज अमरावती केंद्रावर अंतीम टप्प्याकडे सरकणारे नाटक सादर झाले. पुढे आणखी दोन नाट्य प्रयोग सादर होणार आहेत.

पडदा उघडतो आणि दिसते भारत -पाकिस्तान सीमारेषेवर असलेली भारतीय सेनेची चौकी / बंकर आणि पाहऱ्यावर असणारा सैनिक माजीद. एव्हड्यात रंगमांच्यावर प्रवेश घेते एक अनोळखी मुलगी गीता आणि या दोघांच्या संवादातुन लक्षात येते की ती मुलगी चुकीने बॉर्डर ओलांडून पाकिस्तानातून भारतात आलेली आहे. मनुष्य जीवनात पुढे जात असताना तो वेगवेगळ्या प्रसंगाना, घटनांना, सुखाला दु:खाला सामोरा जात असतो. या प्रवासात तो चांगले वाईट अनुभव आपल्या मनाच्या गाभाऱ्यात साठवत असतो, आणि आयुष्यचक्राच्या या गतिमान प्रवासात स्मृतीची एक मजार त्याच्या मनात तयार होत असते.बंकर पाशी आलेल्या गीता आणि माजिद मधे वेगवेगळ्या विषयावर चर्चा सुरु असताना माजीद च्या मनात त्याचा भूतकाळ डोकावत असतो आणि तो भूतकाळ नाटकात दृश्य स्वरूपात दाखवल्या गेला आहे. या संवादातून अचानक विषय निघतो तो सैनिकांच्या पत्नीच्या भावनांचा आणि मग माजिद च्या मनातील पुरुष जागा होतो आणि ती मुलगी म्हणजे फक्त एक स्त्री त्याला दिसायला लागते, तो तिच्या जवळ जातो आणि पुढे काय अघटित घडणार या काळजीत प्रेक्षक असताना पहिल्या अंकाचा पडदा पडतो.

सूचक नेपथ्य, नेमकं संगीत आणि प्रकाशयोजना या नाट्यकृतीत रसिकांना अनुभवायला मिळाली.

इरफान मुजावर लिखित आणि अभिजित देशमुख दिग्दर्शीत मजार या नाटकाची निर्मिती विदुषक प्रतिष्ठान , अमरावती यांची आहे.



**तांत्रिक बाजू म्हणजे नेपथ्य** – दीपक नांदगावकर यांनी तर संगीत– पलाश मखे, प्रकाश योजना – वैष्णवी राजगुरे, रंगभूषा वेशभूषा – पयोषणी देशमुख यांनी सांभाळली.

**आजच्या या नाट्यकृतीत जवळपास १२कलावंतांनी भूमिका साकारल्यात. माजिद** – अभिजित देशमुख , गीता – श्रद्धा पेंडसे, आई – पल्लवी सपकाळ, जहिरा – कीर्ती देशमुख, आजोबा – अनिमेश फाटे, बाबा – हिमांशू इहरे, लल्लन – यश भिडेकर, यास्मिन – विजया पातूर्डे आणि माणूस क्र. १,२,३आणि ४ – अनुक्रमे तेजस लहाने, अभिषेक देव, परीक्षित शहाकार, वेदांत केकाडे यांनी भूमिका साकारल्यात. मंगळवार दि. ५ डिसेंबर रोजी युवा जागर कला केंद्र , अमरावती निर्मित, रजनीश जोशी लिखित आणि डॉ. अनंत देव दिग्दर्शीत भूल भिंगरी ' हे नाटक संत ज्ञानेश्वर नाट्य गृहात सायंकाळी ठीक ७.०० वाजता सादर होईल. रसिक प्रेक्षकांनी कृपया नोंद घ्यावी अशी विनंती स्पर्धा समन्वयक ऍड. चंद्रशेखर डोरले आणि सहसमन्वयक श्रद्धा पाटेकर व विशाल फाटे यांनी केले आहे.

# मिचाँग चक्रीवादळाचा तामिळनाडू, आंध्र प्रदेशात कहर; चेन्नईत ५ जणांचा मृत्यू

## तीन दिवस नवजीवन एक्सप्रेसरद्द तर अनेक उड्डाणे रद्द

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक –** आंध्र प्रदेश येथील चक्रीवादळ 'मिचौंग' चा रेल्वेला देखील फटका बसत आहे. खबरदारीचा उपाय म्हणून रेल्वे प्रशासनकडून काही प्रवासी रेल्वे गाडी रद्द करण्यात येत आहे. यामध्ये भुसावळ विभागातील नवजीवन एक्सप्रेस रेल्वेगाडीचा समावेश आहे. तीन दिवस नवजीवन एक्सप्रेस धावणार नाही.

मिचाँग चक्रीवादळ देशाच्या दक्षिणेकडील राज्ये तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात कहर करत आहे. चेन्नईत वादळ आणि मुसळधार पावसामुळे ५ जणांचा मृत्यू झाला आहे. यासोबतच अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. गृहमंत्री अमित शहा यांनी तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

मिचाँग चक्रीवादळ येत्या २४ तासांत धडकण्याची (लँडफॉल) शक्यता असल्याने तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश हाय अलर्टवर आहेत.

चेन्नईने आधीच शाळा बंद केल्या आहेत. किनारी भाग ओसाड झाला आहे. तामिळनाडूला पावसाचा तडाखा बसेल, तर आंध्र प्रदेशात कहर होईल, असे संकेत हवामान खात्याने दिले आहेत.



### नेमका काय झाला परिणाम?

पावसामुळे चेन्नई विमानतळावर पाणी साचल्याने कामकाज सोमवारी सकाळपासून थांबले असून मंगळवारी सकाळपर्यंत बंद ठेवण्यात येणार आहे. १२ देशांतर्गत विमान उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त, एका खासगी वाहकाने दुबई आणि श्रीलंकेच्या विमानासह चार आंतरराष्ट्रीय सेवा रद्द केल्या आहेत, तर तीन आंतरराष्ट्रीय उड्डाणे बंगळुरूला वळवण्यात आली. रेल्वेने तामिळनाडूला जाणाऱ्या आणि येणाऱ्या एकूण २०४ गाड्या रद्द केल्या आहेत.

चक्रीवादळ आज बापटला किनारपट्टीवर पोहोचण्याची शक्यता लक्षात घेता, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री वायएस जगन मोहन रेड्डी यांनी अधिकाऱ्यांना मदत उपाययोजना करण्यासाठी हाय अलर्टवर राहण्याचे निर्देश दिले. तीव्र चक्रीवादळाच्या प्रभावामुळे आंध्र प्रदेशातील मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने तिरुपती, नेल्लोर, प्रकाशम, बापटला, कृष्णा, पश्चिम गोदावरी, कोनासीमा आणि काकीनाडा या ८ जिल्ह्यांसाठी अलर्ट जारी केला आहे.

चेन्नईतील अनेक भागात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे ओमंडुरार शासकीय मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या बाहेरील वालजाह रोड, माउंट रोड, अण्णा सलाई, चेपॉकसह अनेक भाग पाण्याखाली गेले आहेत. मुसळधार पावसामुळे चेन्नईच्या लोकप्रिय मरीना बीचला पूर आला होता आणि माउंट रोड ते मरीना बीचपर्यंतचे रस्ते पाणी साचल्यामुळे ब्लॉक झाले होते.

# रेल्वेच्या एलएचबी कोचला स्टॅटिक वॉटर लोड टेस्टिंग युनिटची जोड

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** मध्य रेल्वे मुंबई विभागाने एलएचबी (लाल डब्यांची गाडी) शक्ती यानची चाचणी प्रक्रिया सुव्यवस्थित करण्याच्या उद्देशाने एक महत्त्वपूर्ण उपाययोजना तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस आणि वाडीबंदरच्या कोचिंग डेपोमध्ये 'स्टॅटिक वॉटर लोड टेस्टिंग युनिट्सची' ओळख ही कार्यक्षमता वाढविणे आणि चलनातील अडचणी कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहेत. मध्य रेल्वेच्या इतर कोणत्याही कोचिंग डेपोमध्ये स्थापित केलेली ही पहिलीच सुविधा आहे.

शक्ती यान (पॉवर कार) रेल्वेच्या संपूर्ण डब्यांसाठी ऊर्जेचा महत्त्वाचा स्रोत म्हणून काम करते आणि ते डब्यांमधील दिवे, पंखे, वातानुकूलित यंत्रणा, मोबाइल चार्जिंग पॉइंट यांसारख्या विविध घटकांना वीज पुरवते. देखभाल दुरुस्तीनंतर, शक्ती यानची क्षमता व व्होल्टेज तपासणी केली जाते, ज्याला सामान्यतः लोड चाचणी, असे म्हणतात. पूर्वी अशा चाचणी प्रक्रियेच्या वेळ अधिक लागत होता. याप्रक्रियेत रेल्वेचे डबे वर्गीकरण प्रक्रिया करावी लागत होती. 'स्टॅटिक वॉटर लोड टेस्टिंग युनिट्सचा' वापर सुरू झाल्यापासून या प्रक्रियेत चांगला बदल झाला आहे. या युनिट्स लोड चाचणीनंतर रेल्वे डब्यांना पारंपरिक पद्धतीच्या अगदी विपरितपणे अतिरिक्त शक्ती यान तत्काळ सेवेसाठी जोडता येत आहेत.

> या नव्या उपक्रमामुळे एलएचबी कोचमध्ये शेवटचा डबा पॉवर कार म्हणून अन्य २२ कोचला वीजपुरवठा सुरळीत करतो. मुंबईत हा उपक्रम सुरू झाला असून, येत्या काळात पुणे, सोलापूर, नागपूर व भुसावळ विभागातही सुरू होणार आहे. आता मनुष्यबळ, विजेचा वापर नियंत्रित होत आहे. एकूण २,३०० एलएचबी डब्यात ही प्रणाली सुरू करण्यात आली आहे.
>
> – **शिवाजी मानसपुरे**, जनसंपर्क अधिकारी, मुंबई मध्य रेल्वे



# दोन एकरात ५५ टन पेठा कोहळ्याचे उत्पादन

## तळणी शिवारात शेतकऱ्याचा यशस्वी प्रयोग


**दि.५विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी,** तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर संत्र्याचे उत्पादन घेत असले तरी अनेक शेतकरी पारंपारिक पिके न घेता नवनवीन प्रयोग करून पारंपरिक शेतीसोबत तंत्रज्ञानाच्या मदतीने आधुनिक शेती करीत आहे. अशीच यशोगाथा तळणी शेतशिवारात द्वारका हायटेक नर्सरीचे संचालक प्रयोगशील शेतकरी प्रफुल्ल हेलोडे यांची आहे. प्रफुल्ल यांनी दोन एकर शेती मक्त्याने घेऊन दहा फूट अंतरावर बेड वाफे तयार करून कर्नाटकातील बंगलोर येथून पेठा कोहळ्याचे बियाणे आणून नर्सरीत रोपटे तयार केले. बेड वाफ्यावर लागवड केली होती. एक एकर जागेवर साधारणपणे ३ हजार ५०० याप्रमाणे दोन एकरावर ७ हजार रोपांची सप्टेंबर महिन्यात लागवड केल्यावर डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पेठा कोहळ्याची परिपूर्ण वाढ झाली असून दोन एकर परिसरात ५५ टन उत्पादन त्यांनी घेतले.



पेठा कोहळ्याची हल्दीराम कंपनीला दहा रुपये प्रति किलोने विक्री केली असून केवळ तीन महिन्यात पाच लाख रुपयाची कमाई केली. युवा प्रयोगशील शेतकरी प्रफुल्ल हेलोडे व्हेटर्नरी सायन्स विभागाचे पदवीधर असून त्यांनी मोर्शी कृषी विभागात ९ वर्ष नोकरी सुद्धा केली होती. नोकरीच्या मागे न लागता त्यांनी कृषी विभागातील नोकरीचा राजीनामा दिला व आता शेती करीत आहे. द्वारका हायटेक नर्सरी येथे प्रफुल्ल हेलोडे टमाटे, मिरची, कोबी, ब्रोकोली इत्यादी पिकाचे नर्सरीत रोपटे तयार करून परिसरातील शेतकर्यांना विक्री सुद्धा करतात. राज्याच्या कृषी मंत्रालयाच्या वतीने प्रयोगशील शेतकरी प्रफुल्ल हेलोडे यांचा उद्यान पंडित पुरस्कार देऊन सन २०१८मध्ये गौरवसुद्धा करण्यात आला होता.

# दिव्यांग मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांचा ग्रामगीता देऊन सत्कार

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** दिव्यांग महाराष्ट्र श्री बॉडी बिल्डिंग स्पर्धेसाठी डॉक्टर संतोष मुंडे उपाध्यक्ष (दिव्यांग मंत्रालय महाराष्ट्र शासन मुंबई) अमरावती आले होते. संवेदनशील व दिव्यांग कैवारी म्हणून डॉक्टर संतोष मुंडे प्रसिद्ध आहे . परळी येथे कान, नाक ,घसा चे ते प्रसिद्ध डॉक्टर आहे. दिव्यांगांचा जनता दरबार घेणे त्यांचे समस्या निवारण करणे, रक्तदान शिबिर दिव्यांग कॅम्प घेणे हे कार्य सतत चालू असतात त्यामुळे ते खरोखरच दिव्यांगांसाठी देवदूतच आहे. अमरावती येथे डॉक्टर संतोष मुंडे (उपाध्यक्ष दिव्यांग मंत्रालय महाराष्ट्र शासन मुंबई) यांचा ग्रामगीता देऊन भव्य सत्कार करण्यात आला. सत्कारला उत्तर देतांनी डॉक्टर संतोष मुंडे म्हणाले लवकर दिव्यांग मंत्रालयात मुंबई दिव्यांग प्रलंबित तक्रारी विषयांवर एक आढावा बैठक लावून योग्य कारवाई करण्यात येईल. अमरावती पॅरा असोसिएशनचे अध्यक्ष व प्रहार दिव्यांग कर्मचारी संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष विलास शिंदे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमा यशस्वी करण्यासाठी सुभाष चव्हाण (राज्यसचिव) प्रशांत शिंद राज्य समन्वयक ,मनोज माने राज्य समन्वयक ,विशाल शिंदे राष्ट्रीय बॉडी बिल्डिंग पंच एडवोकेट विजय वर्मा विजय तायडे (सामाजिक कार्यकर्ते) विनोद रोतडे ,मनोज बनारसे ,ओम शिंदे व इतर परिश्रम केले.



# जिल्ह्यात २ हजार ५०० अंगणवाड्यांना लागले टाळे

## ४ हजारावर सेविका-मदतनीस संपात : शासकीय कर्मचारी दर्जाची मागणी



**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:**

अंगणवाडी सेविकांना महिना २६ हजार आणि मदतनीसांना २० हजार रुपये मानधन द्या, कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा यासह अन्य मागण्यांसाठी अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांनी बेमुदत संप सुरू केला आहे. या संपात सुमारे ४ हजार सेविका-मदतनीस सहभागी झाल्या आहेत. यामुळे जिल्ह्यातील सुमारे २ हजार ५०० हजार अंगणवाड्यांना कुलूप लागले आहे.

अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांच्या राज्य तसेच केंद्र शासनाकडे अनेक मागण्या प्रलंबित आहेत. याबाबर वारंवार आंदोलने केलीत. परंतु, आश्वासनाशिवाय त्यांना काही मिळाले नाही. त्यामुळे आता महाराष्ट्र राज्य अंगणवाडी,बालवाडी कर्मचारी युनियन (आयटक)च्या नेतृत्वात राज्यव्यापी संप सुरू केला आहे. सोमवार हा आंदोलनाचा पहिला दिवस होता. या संपात २३१३ अंमणवाडी सेविका आणि २३१३ मदतनिस असे एकूण ४ हजार ६२६ कर्मचारी यात सहभागी झाल्या होत्या.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांची पदे ही वैधानिक असून त्यांना मिळणारा मोबदला वेतनच आहे. त्यामुळे त्यांना शासकीय कर्मचारी घोषित करुन त्या अनुषंगाने वेतनश्रेणी, ग्रॅच्युईटी, भविष्य निर्वाह निधी आदी सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ द्यावा. मानधन वाढलेतरी महागाई दुपटीने वाढते. यासाठी महागाई निर्देशांकाला जोडून दर सहा महिन्यांनी मानधनात वाढ करावी. कर्मचाऱ्यांचा पेन्शनचा प्रस्ताव तयार करुन तो हिवाळी अधिवेशनात मंजूर करावा अशा विविध मागण्यांसाठी संप सुरु असल्याचे अंगणवाडी,बालवाडी कर्मचारी युनियनचे जिल्हाध्यक्ष महेश जाधव यांनी सांगितले.

# चिमुकल्यावर कुत्र्याचा प्राणघातक हल्ला

## नागरिकांच्या सतर्कतेने संकट टळले

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक वरूड,**शेंदूरजनाघाट शहरातील मलमशावली येथील आझाद चौक परिसरात आरव प्रुल्ल शिंगरवाडे हा सहा वर्षाचा चिमुकला घराजवळ खेळत असताना परिसरात वावरणाया एका कुत्र्याने त्याच्यावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना शनिवार २ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजताच्या दरम्यान घडली. नागरिकांच्या सतर्कतेमुळे या वेळी मोठा अनर्थ टळला, परंतु चिमुकल्याच्या शरीरावर कुत्र्याने चावा घेतल्याने दातांचे निशाण बनले आहे. या बाळाला सर्वप्रथम प्रथमोपचाराकरिता शें.घाट येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले होते; मात्रब ते बंद असल्याने त्याला तात्काळ पुसला येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तेथे त्याच्यावर उपचार करण्यात आले.ङ्गङ्गअशा घटना शें.घाट शहरात मागील कित्येक दिवसांपासून वारंवार घडताना दिसत आहे. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने याबाबत लवकरच लक्ष देऊन अशा पिसाळलेल्या कुत्र्यांना आवर घालावा, जेणेकरून कुठलीही विपरित घटना शहरात घडू नये, तसेच आरोग्य अधिकारी, डॉक्टर व आरोग्य कर्मचाय्यांनी अशा रूग्णाची योग्य दखल घेत त्याला प्रथमोपचार देण्यासाठी सज्ज असायला हवे, जेणेकरून रूग्णाची धावपळ होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केल्या जात आहे. ऊस रींरलज्ञ प्राथमिक आरोग्य केंद्रात रॅबीज इंजेक्शन उपलब्ध करण्यासाठी स्थानिक आरोग्य अधिकाय्याला विश्वासात घेऊन लोकप्रतिनिधींनी जिल्हा आरोग्य विभागाकडून तरतूद करून घ्यावी, कारण ब्याच औषधी शें.घाट येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. या सगळ्या गोष्टी लक्षात घेता शें.घाट येथील प्राथमिक आरोग्य केंद्र फक्त नावापुरतेच उरले असल्याचे दिसून येत आहे.





# काँग्रेसची इर्विन चौक ते नया अकोला अभिवादन यात्रा

## अभिवादन यात्रेत सहभागी व्हा : आमदार ॲड. यशोमती ठाकूर

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीतर्फे इर्विन चौक ते श्रद्धा भूमी नया अकोला अशी उद्या ६ डिसेंबर रोजी अभिवादन यात्रा काढण्यात येणार आहे.





अमरावती जिल्हा ग्रामीण काँग्रेस व शहर काँग्रेस कमेटी यांच्या संयुक्त विद्यमाने इर्विन चौक अमरावती ते श्रद्धा भूमी नया अकोला अशी काढण्यात येणारी ही अभिवादन यात्रेला सकाळी ९ वाजता इर्विन चौकातून प्रारंभ होणार असून शहरातील पंचवटी चौक, कठोरा नाका, हर्षराज कॉलनी, नवसारी, वलगांव मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्थिस्मारक असलेल्या श्रद्धा भूमी नया अकोला येथे अभिवादन यात्रेचा समारोप होणार आहे. त्यानंतर नया अकोला येथील जिल्हा परिषद प्रांगणात अभिवादन सभा आयोजित करण्यात आलेली असून आमदार ड. यशोमती ठाकूर, जेष्ठ विचारवंत रावसाहेब कसबे, कैलास कामोद आदी मान्यवर मार्गदर्शन करतील.

अभिवादन यात्रेत आमदार बळवंत वानखडे, माजी आमदार विरेंद्र जगताप, माजी पालकमंत्री डॉ. सुनिल देशमुख, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अनिरुद्ध देशमुख, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, महिला काँग्रेसचे अध्यक्ष कांचनमाला गावंडे, काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते ड. दिलीप एडतकर, शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. अंजली ठाकरे, अमरावती बाजार समितीचे सभापती हरिष मोरे, माजी बांधकाम सभापती जयंत देशमुख, जिल्हा अल्पसंख्यांक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मुकद्दर खाँ पठान, किशोर बोरकर, हरिभाऊ मोहोड, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष भैय्या पवार, जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष पंकज मोरे, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रविण मनोहर, प्रदिप देशमुख, ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष संजय नागोने, सरपंच सुजाता तिडके आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.

### कन्हैय्याकुमार यांची उपस्थिती

सीडब्ल्यूसी सदस्य कन्हैय्याकुमार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्हा काँग्रेस व शहर काँग्रेस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने काढण्यात येणाऱ्या अभिवादन यात्रेत सहभागी होणार आहेत. तसेच जिल्हा परिषद प्रांगणात होणाऱ्या अभिवादन सभेला उपस्थित राहून ते मार्गदर्शन करणार आहे.

### अभिवादन यात्रेत सहभागी व्हा

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांची कास आजवर काँग्रेस पक्षाने धरलेली आहे. त्यांच्या विचारानुसारच पक्षाचे धोरण असून समाजातील शोषीत, पिढीतांना न्याय देण्यासाठी काँग्रेस पक्ष कटिबद्ध आहे. त्याच्याच अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिस अभिवादन करण्यासाठीच जिल्हा काँग्रेस व शहर काँग्रेस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे. या अभिवादन यात्रेत सहभागी होण्याचे आव्हाण आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी जिल्ह्यातील तमाम नागरिकांना केले आहे.

# दोषी आढळलेल्या 'त्या' तत्कालीन ९ अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार?

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक परतवाडा**




अचलपूर नगर परिषद अंतर्गत अण्णा भाऊ साठे नागरी दलितवस्ती सुधार योजनेतील विकासकामांच्या आरोप-प्रत्यारोपाच्या अनुषंगाने तत्कालीन ३ मुख्याधिकारी, ३ नगर अभियंता व २ कनिष्ठ अभियंत्यांची नावे जिल्हाधिकाऱ्यांनी नगर विकास खात्याचे प्रधान सचिव आणि नगरपरिषद प्रशासन संचालनालय (मुंबई) यांच्याकडे उचित कार्यवाहीसाठी सादर केली आहेत.

अण्णा भाऊ साठे दलितवस्ती सुधार योजनांतर्गत २०१७-१८ मध्ये परतवाडा शहरात दोन, तर २०१४-१५ मध्ये एक काम अचलपूर शहरात मंजूर केले गेले. सरकारच्या मंजुरीनुसार या तीनही कामांची अंदाजपत्रकीय रक्कम ७३ लाख ५३ हजार ६० रुपये होती, यातील झालेल्या कामावर अचलपूर नगर परिषदेकडून ४७ लाख २१ हजार १६९ रुपये खर्च केले गेले आहेत. या कामांच्या संदर्भातील अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार आहे. यातील तीनही नगर अभियंता हे सध्यास्थितीत निवृत्त झाले, तर कनिष्ठ अभियंत्यांचे निधन झाले आहे.

### तपासणी पथक केले गठित

अचलपूर नगर परिषदेकडून ही कामे न करताच बिल काढले गेल्याचा आरोप करण्यात आला तसेच लिखित तक्रारही केली गेली. तक्रारीच्या अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या तपासणी पथकाकडून या कामांची तपासणी केली गेली. प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले गेले. पथकाने अंदाजपत्रकातील निष्काळजीपणावर बोट ठेवले. कामाचे अंदाजपत्रक प्रत्यक्ष साइटनुसार केलेले नाही. अंदाजपत्रक निष्काळजीपणाने बनविल्यामुळे कामे अर्धवट दिसून येतात.

### जागा बदलविण्याचे प्रकरण गंभीर

अचलपूरमधील कामाची जागा बदलविण्याचे प्रकरण गंभीर असल्याचे चौकशी पथकाने आपल्या स्थळ निरीक्षण अहवालात नमूद केले. तर नगर परिषदेचा ठराव घेऊन संबंधित प्राधिकरणाची पूर्व मंजुरी जागा बदलताना घेतली गेली नाही. संबंधितांकडून खुलासा मागवून संबंधितांवर नियमानुसार कारवाई करणे आवश्यक वाटत असल्याचे चौकशी समितीने आपल्या अहवालात नमूद केले.

# येवदा सरपंचा ग्रामसभेततील ठरावाची अंमलबजावणी करीत नसल्याने बिडीओ यांच्या दालनात मुक्काम आंदोलन

## नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी; बिडीओ यांच्याकडे गावकऱ्यांची मागणी

**दि५विदर्भ प्रजासत्ताक येवदा**

दर्यापुर तालुक्यातील येवदा ग्रा.प. वतीने नागरिकांना भेडसावनाऱ्या समस्या सोडविण्यात प्रशासन कमी पडत आहे. ग्रा.प. येवदा प्रशासनाच्या विरोधात प्रहार जनशक्ती पक्ष, विविध पक्ष संघटना व गावकर्यांनी येवदा येथील मुख्य गांधी चौकात आंदोलने, निदर्शने केली, सन २०२१-२३ या काळातील ग्रामसभेत सरपंचा यांनी विकास कामाबाबत विचारणा केली असता येवदा सरपंचा प्रतिभाताई माकोडे यांच्या मेरी सुनो धोरणामुळे गावाचा विकास खुंटला असल्याचा आरोप गावकर्यांनी ग्रामसभेत केला. तसेच सरपंचा कडून ग्रामसभेत कायम ग्रामस्थांचा अपमानस्पद वागणूक देण्यात आली. दि. ३०-११-२०२३ रोजीच्या ग्रामसभेत अखेर ग्रामस्थांनी सरपंचा प्रतिभाताई माकोडे यांच्या विरोधात या पुढील होणाऱ्या ग्रामसभांचे आयोजन करू नये म्हणून ग्रामस्थांनी ग्रामसभेत ग्रा. प. येवद्याची निवडणूक लागेपर्यंत ग्रामसभा घेण्यात येऊ नयेत, ग्रामसभेत घेण्याबाबत बहिष्कार टाकला व असा ठराव सुध्दा सर्वानुमते ग्रामसभेत पारित करण्यात आला. ग्रामसभेतील ठरावाचे अनुषंगाने ग्रामविकास,



पंचायत राज मुंबई, वरिष्ठ कार्यालयाचे तातडीने मार्गदर्शन मागविण्यात यावे व सरपंचा प्रतिभाताई माकोडे यांनी ग्रामसभा ठरावाची अवहेलना केली असल्याने महाराष्ट्र शासन नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी असी मागणी सुध्दा करण्यात आली. पंचायत समिती दर्यापूर बिडीओ विनोद खेडकर हे अंजनगाव कार्यालयात असल्यामुळे सहाय्यक बिडीओ तथा तक्रार निवारण अधिकारी चंद्रशेखर धवक व संदीप देशमुख विस्तार अधिकारी, यांच्याकडे निवेदन सादर केले. सहाय्यक बिडीओ तथा तक्रार निवारण अधिकारी चंद्रशेखर धवक यांना विलास कैसर, प्रदीप वडतकर व इतर गावकर्यांनी समस्यांचा, तक्रारी बाबतचा निपटारा करण्यात असी मागणी केली. तसेच येवदा गावातील समस्यांचा निपटारा करण्याची जबाबदारी आता पंचायत समिती दर्यापूर बिडीओ, सहाय्यक बिडीओ तथा तक्रार निवारण अधिकारी चंद्रशेखर धवक यांची असल्याने त्यांच्या सोबत बिडीओ यांच्या दालनात शिष्ठ मंडळाने चर्चा केली. चर्चे दरम्यान प्रविण कासारकर यांनी मुद्दा उपस्थित करीत सन २०२१-२३ या कार्यकाळातील पंचायत समिती दर्यापूर विभागाचे विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी सुध्दा विकास कामाबाबत व तक्रारींचा निपटारा करीत नसल्याने ते सुध्दा तेवढेच जबाबदार आहेत. त्यामुळे विकासकामे बाबत प्रशाकीय कामात कसूर करून दप्तर दिरंगाई केली असल्याचा आरोप प्रहारचे विलास कैसर यांनी प्रशासनाच्या कामकाज बाबतीत तक्रार निवारण अधिकारी चंद्रशेखर धवक यांच्याकडे केला.

विलास कैसर, प्रदीप वडतकर यांनी बिडीओ विनोद खेडकर, तक्रार निवारण अधिकारी चंद्रशेखर धवक यांना दि. ३१-१२-२०२३ रोजीच्या अल्तीमेट दिला असून सदर समस्यांचा निपटारा तात्काळ करावा. अन्यथा दि.०१-०१-२०२४ पासून नवीन वर्षाची सुरवात बिडीओ दर्यापूर यांच्या दालनात मुक्कामी राहून आंदोलन करणार असल्याचा इशारा सुध्दा बैठकीत प्रहारच्या गावकर्यांच्या वतीने प्रदीप वडतकर यांनी दर्यापूर बिडीओ पंचायत समिती, जिल्हा प्रशासनाच्या अधिकारी यांना दिला. प्रदीप वडतकर, विलास कैसर यांच्या नेत्वृत्वात निवेदन सादर करतांना, प्रविण कासारकर, गुड्डू जाहगिरदार, अहसान्नोदिन रियाजउद्दीन, अहेमद खान सुभेदार खान, नागोराव काळमेघ, नागेश चौरे, सुदर्शन वडतकर, शिवकुमार कैसर, ऋषी धाबे, स्पनील चौरपगार, शाम भारती, विश्वजित राऊत इतर नागरिकांची उपस्थिती होती.

# पाच घरफोड्यांची कबुली : यवतमाळ चे दोघे अटकेत

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

शहरात गत काही दिवसांपासून चोऱ्या आणि घरफोडींची संख्या झपाट्याने वाढत होती. त्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखा युनीट दोनच्या पथकाने दोघा सराईतांना नुकतीच अटक केली. त्यांनी घरफोड्यांच्या एकूण पाच घटनांची कबुली दिली.



सुरेश ऊर्फ जादू शेंड्यापिशा नरेंद्र मलांडे (वय २०, रा. आठवडी बाजार, यवतमाळ), शंकर श्यामराव घुडसे (वय ३५, रा. चिखली, जि. यवतमाळ). अशी अटक झालेल्या दोघा सराईतांची नावे असल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक राहुल आठवले यांनी दिली.

ज्या पाच घरफोड्यांची कबुली या सराईतांनी दिली, त्यामध्ये चार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील घटना असून एक घरफोडी यवतमाळच्या लोहारा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आहे.

गुन्हे शाखेचे पथक राजापेठ ठाण्याच्या हद्दीतील एका बारमधील प्रकरणाची चौकशी करीत असताना या दोघांना पकडले. सदर बारमधून घटनेच्या दिवशी १८ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला होता. त्यात तीन हजारांची रोख रक्कमही होती. त्याच प्रकरणात सुरेश ऊर्फ जादू व शंकर, या दोघांनी बार ॲण्ड रेस्टॉरंटमधील घरफोडीची कबुली दिली. अधिक चौकशी केली असता नमूद दोघांनी राजापेठसह खोलापुरीगेट, फ्रेजरपुरा, गाडगेनगर अशा चार ठिकाणी घरफोड्या केल्याची कबुलीसुद्धा दिली

# जागतिक बौद्ध महासभेच्या वतीने महापरिनिर्वाणदिनानिमित्त उद्याला अभिवादन कार्यक्रम

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त उद्या बुधवार, ६ डिसेंबर रोजी जागतिक बौद्ध महासभा आणि आंबेडकरवादी बहुजन पँथर सेनेच्या वतीने इर्विन चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुणर्णाकृती पुतळ्याला हारार्पण करुन अभिवादन करण्यात येणार आहे.

महापरिनिर्वाणदिनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपाइंच्या डॉ. कमल गवई तर प्रमुख अतिथी म्हणून जागतिक बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भन्ते संघपाल जीवक थेरो, आंबेडकरवादी बहुजन पँथर सेनेचे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब खडसे, पीरिपाचे क्रांतिभूषण खडसे, योगाचार्य तथा माजी मुख्याध्यापक



आनंदराव हिवराळे यांची उपस्थिती राहणार आहे. या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये ६ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता सामुहिक अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात भिख्खू डॉ. संघपाल जीवक वेरो यांच्याकडून उपस्थितांना त्रिशरण पंचशील देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हारार्पण करुन सामुहिक अभिवादन करण्यात येणार आहे.

अभिवादन सभेला आंबेडकरी अनुयायी, बौद्ध उपासक, उपासिका व भिख्खू संघाने उपस्थित राहण्याचे आवाहन . संघपाल जीवक थेरो, भन्ते प्रज्ञाबोधी महाथेरो, क्रांतिभूषण खडसे, आनंद हिवराळे यांनी केले आहे,

# महिला मोर्चाच्या अध्यक्षपदी प्रीती गिरपुंजे

## वडनेर येथे भाजपच्यावतीने जंगी स्वागत

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर**

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वडनेरगंगाई येथील अध्यक्षपदी प्रीती श्रीकृष्ण गिरपुंजे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तालुकाध्यक्ष मदन पाटील बायस्कार, यांच्या मार्गदर्शनाखाली प्रीती श्रीकृष्ण गिरीपुंजे यांची तालुक्यातील वडनेर गंगाई येथील महिला मोर्चाच्या अध्यक्षपदी निवड केली आहे.



त्यानिमित भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. तालुक्यातील वडनेर गंगाई येथील प्रीती श्रीकृष्ण गिरपुंजे यांचा परिसरात दांडगा जनसंपर्क आहे. महिलांच्या प्रश्नांची त्यांना जाणीव आहे. त्यांच्या या सर्वसमावेशक कार्याची दखल घेत भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा राज्यसभेचे खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष अनिताताई तिखीले यांनी जिल्हा कार्यकारणीचे सदस्य नकुल सोनटक्के, किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष संजय वाघमारे, महिला मोर्चा उपाध्यक्ष मालाताई डोईफोडे, त्यांच्या निवडीबद्दल युवा मोर्चा जिल्हा प्रसिद्धिप्रमुख ऋषीकेश इंगळे, शाखाप्रमुख सुनील गावंडे, युवा मोर्चा शाखाप्रमुख कुलदीप हागे, विनोद पाटील गोंडचर, अभिजीत मावळे, वसंत रेवस्कार, रोशन काळे, अनंत मानेकर, रोशन चकुले, श्रीकृष्ण गिरपूंजे यांनी त्यांचा सत्कार करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# भूमी अभिलेख कार्यालयाच्या माहिती पुस्तिकेचे लोकार्पण

## भूमी अभिलेख विभागाची स्पृहणीय कामगिरी : जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भूमि अभिलेख कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना माहिती सुलभरीत्या समजावी तसेच त्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी कार्यालयाची प्राथमिक माहिती पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेचे लोकार्पण जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचे हस्ते नुकतेच करण्यात आले. या प्रसंगी स्वामीत्व योजनेतील लाभार्थ्यांना मिळकतींच्या सनदाचे वाटप श्री. कटियार यांचे हस्ते करण्यात आले.



मार्गदर्शन पुस्तिकेचा नागरिकांना निश्चितच लाभ होणार असून भूमी अभिलेख कार्यालय संदर्भातील कामे अधिक सुलभतेने होणार आहे. अमरावती विभागात सर्वप्रथम अशा प्रकारची माहिती व मार्गदर्शन पुस्तिका तयार करणारे अमरावतीचे उपधीक्षक कार्यालय असल्याचे गौरवोद्गार जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी काढले. भूमि अभिलेख विभाग सामाजिक जाणीवेतून सकारात्मक व ठोस कार्य करीत असल्याचे समाधान त्यांनी यावेळी व्यक्त केले.

शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य तळागाळातील लोकांपर्यंत सहज सुलभरित्या पोहचविण्यासाठी राज्य शासनाने शासन आपल्या दारी ही योजना सुरु केलेली आहे. या उपक्रमाअंतर्गत उप अधीक्षक भूमी अभिलेख अमरावती यांनी स्वामीत्व योजना-ड्रोन सर्वेचे काम पूर्ण करून ग्रामीण भागातील मूळ गावठाणामध्ये राहणाऱ्या हजारो लोकांना त्यांच्या मिळकतींचे अधिकार अभिलेख, मालकी हक्काचा पुरावा -पीआर कार्ड उपलब्ध करून दिले आहेत. याशिवाय भूमि अभिलेख कार्यालय संदर्भातील प्राथमिक माहिती पुस्तिका उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ही पुस्तिका भूमिअभिलेख उपअधीक्षक अनिल फुलझेले यांनी तयार केली आहे. यावेळी अमरावती विभागाचे भूमि अभिलेख उपसंचालक लालसिंग मिसाळ, भूमि अभिलेख उपअधीक्षक अनिल फुलझेले व कार्यालयातील सर्व कर्मचारी वृंद व नागरिक उपस्थित होते.

# मनोज जरांगे पाटील जानेवारीमध्ये राजकारणात येतील

## रोहित पवार यांचा खळबळजनक दावा



**दि.५विदर्भ प्रजसत्ताक अमरावती**

मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच गाजत आहे. यासाठी मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले होते. आता मनोज जरांगे पाटील हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. त्यांच्या अनेक ठिकाणी सभा आयोजित केल्या जातात. यावर राजकीय वर्तुळातून अनेक प्रतिक्रिया येत असतात.

यातच आता रोहित पवार यांनी मनोज जरांगे पाटील यांच्याविषयी खळबळजनक दावा केला आहे. मराठा आरक्षणसाठी लढा उभारणारे मनोज जरांगे पाटील राजकारण प्रवेश करतील असा दावा आमदार रोहित पवारांनी केलाय. मनोज जरांगे पाटील जानेवारीमध्ये राजकारणात येतील असंही रोहित पवार म्हणालेत.मराठा आरक्षणासाठी लढणाऱ्या जरांगे पाटलांनी कधीही राजकारणात जाणार नाही असं म्हटलं होतं. सातत्यानं राजकारण प्रवेशाच्या बातम्यांचा त्यांनी विरोध केला होता. पण आता रोहित पवारांनी जरांगे पाटलांच्या राजकारणातील प्रवेशाची थेट तारीखच जाहीर करुन टाकली आहे.

आता पुन्हा जरांगे पाटलांच्या राजकारण प्रवेशाची चर्चा सुरु झालीय. जरांगे पाटील एखाद्या राजकीय पक्षात जातील की स्वतःचा वेगळा पक्ष काढतील हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

# एकदिवसीय धरणे आंदोलनातून वेधले राज्य सरकारचे लक्ष

## महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसिलदार संघटना आपल्या मागण्यांवर ठाम




**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महाराष्ट्र राज्य तहसीलदार, नायब तहसिलदार संघटनेने पुकारलेल्या आंदोलनात काहीसा बदल करण्यात आला आहे.आता मंगळवार दिनांक ५ डिसेंबर पासून आपल्या मागण्यांना घेऊन सुरुवात झाली आहे. नंतरच्या टप्प्यात १८ डिसेंबरला प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर दोन तास धरणे देऊन आगामी २८ डिसेंबर पासून बेमुदत संप सुरू केला जाणार आहे. मंगळवार दिनांक ५ डिसेंबर रोजी विभागीय आयुक्त( महसूल )यांच्या कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करीत तसेच मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करून यावेळी संघटनेच्या वतीने राज्य शासन व स्थानिक प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.नायब तहसिलदार राजपत्रित वर्ग-२ यांचे ग्रेड पे ४,८०० रुपये करण्याचे अनुषंगाने के.पी.बक्षी यांच्या अध्यक्षतेखालील वेतन त्रुटी समितीने ( बक्षी समिती)शिफारस केली होती. ती मान्य करून, त्या संदर्भातील शासन निर्णय तात्काळ निर्गमित करावे, अशी संघटनेची जुनी मागणी आहे. या मागणीसाठी ३ मार्चपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले होते. मात्र महसूल मंत्री महोदयांनी हस्तक्षेप केल्यानंतर काही दिवसांनी ते आंदोलन मागे घेण्यात आले. पुढे मागणी मान्य करण्याचे अनुषंगाने महसूल विभागाकडून सकारात्मक अभिप्राय सादर केल्यानंतर त्या प्रस्तावावर ५ एप्रिल रोजी रात्री उशिरा उप-मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांची मान्यता घेण्यात आली. यापुढील कार्यवाही करण्यासाठी एप्रिल अखेरपर्यंत प्रशासकीय कालावधी लागणार असल्याने हा संप मागे घेण्यात आला. परंतु अद्याप नायब तहसिलदार संवर्गाचे ग्रेड-पे वेतन वाढीबाबत शासन स्तरावरून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात स्थगित झालेले सदर आंदोलन पुन्हा सुरू करण्याचा संघटनेस नाईलाजास्तव निर्णय घ्यावा लागला.मंगळवारी प्रभारी-विभागीय आयुक्त( महसूल) तसेच उप-आयुक्त पुनर्वसन - गजेंद्र बावने यांना यावेळी आपल्या मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. या टप्पानिहाय आंदोलनाला घेऊन यावेळी महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब तहसिलदार संघटनेचे उपाध्यक्ष-अरविंद माळवे ग्रेड-पे मंजूर झालेला नसल्याने हे आंदोलन पुन्हा सुरू करण्यात आले आहे. तसेच राज्यस्तरीय बैठकीत निश्चित करण्यात आलेल्या टप्पानिहाय आंदोलन नुसार दिनांक १८ डिसेंबर रोजी शासनास स्मरणपत्र देणे व जिल्हास्तरावर २ तास धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. यासोबतच मागण्या मान्य न झाल्यास २८ डिसेंबर २०२३ पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात येणार आहे. अशी माहिती देऊन यावेळी उप-आयुक्त गजेंद्र बावने यांना अवगत करण्यात आले. नायब तहसिलदार संवर्गाचे ग्रेड-पे वेतन वाढीबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करून त्याची अंमलबजावणी संदर्भातील आदेश निर्गमित करावेत,अशी मागणी करीत यावेळी सुधीर खडसे व वैशाली पाथरे यांनी दिली.

# विदर्भात कापसाचे दर गेल्या वर्षीपेक्षा कमीच

## सध्या कापसाला सरासरी ६ हजार ८०० ते ७ हजार रुपये प्रतिक्विंटल भाव



**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

यंदा कापसाला बाजारात गेल्या वर्षीपेक्षाही कमी दर मिळत असल्याने कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत. सध्या विदर्भातील बाजारात कापसाला सरासरी ६ हजार ८०० ते ७ हजार रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत आहे.

दोन वर्षांपूर्वी कापसाला विदर्भात काही दिवस प्रतिक्विंटल १३ ते १४ हजार रुपयांचे दर मिळाले होते. मागील वर्षीही ९ हजार ७०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत भाव पोहोचले होते. नंतर मात्र कापूस अनेक दिवस प्रतिक्विंटल आठ, साडेआठ हजार रुपयांवर स्थिरावला होता.

सध्या कापसाची वेचणी सुरू झाली असून नवीन कापूस बाजारात आला आहे. मात्र बाजारात कापसाचे दर मागील वर्षीपेक्षा आताच प्रतिक्विंटल १२०० ते १५०० रुपयांनी कमी आहेत. सध्या अमरावती अकोल्याच्या खासगी बाजारात कापसाला प्रतिक्विंटल ७ हजार ३०० रुपये भाव आहे. कापूस खरेदीदारांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार आगामी पंधरा दिवसांत बाजारात कापसाची आवक वाढेल, त्यावेळी कापसाचे दर थोडे कमी होऊ शकतात. मागील वर्षी नवीन कापसाला प्रारंभी ९ हजार ७०० रुपयांपर्यंत दर मिळाला होता.

गेल्या वर्षी सोयाबीन व कापसाला अपेक्षित भाव शेतकऱ्यांना मिळाला नसला तरी नगदी पीक म्हणून शेतकऱ्यांची पसंती कापूस व सोयाबीन पिकालाच आहे. परंतु सोयाबीन पाठोपाठ कपाशीच्या पिकानेही माना टाकल्याने उत्पादनात निम्म्यापेक्षा जास्त घट होईल असे चित्र आहे.

कापसाचे लागवड क्षेत्राच्या बाबतीत विदर्भ अग्रेसर असला तरी उत्पादकतेत मात्र सर्वात पिछाडीवर आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे या वर्षी या उत्पादकतेत अजून घट होण्याची शक्यता आहे. कापसाचा उत्पादन खर्च वाढत असताना एकरी जेमतेम तीन ते चार क्विंटल उत्पादनामुळे ही शेती प्रचंड तोट्याची ठरू लागली आहे. कोरडवाहू शेतीत बीटी कापसाची उत्पादकता खूपच कमी आहे.

# ७ डिसेंबरपासून खासदार आमदारांना गावबंदी कशासाठी?




**दि.५विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

सोन्याची कुऱ्हाड असलेला विदर्भ गरीब का झाला, असा प्रश्न विचारून पालकमंत्री तथा सर्व पक्षीय खासदार, आमदारांना ७ डिसेंबरपासून गावबंदी करण्यात येत आहे, अशी घोषणा विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष व माजी आमदार ड. वामनराव चटप यांनी सोमवारी पत्रपरिषदेत केली.

महाराष्ट्रात २ लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी विदर्भातील ७० टक्के म्हणजे १ लाख ४० हजार शेतकरी आहेत. महाराष्ट्रातील २७०३ ओसाड गावांपैकी विदर्भांत ८५ टक्के म्हणजे २३०५ गावे ओसाड आहेत. पुण्या-मुंबईकडे विदर्भातील मुले नोकरीला जात असल्याने लोकसंख्या कमी होऊन ६६ऐवजी ६२ विधानसभा मतदारसंघ राहिले आहेत. महाराष्ट्राने विदर्भाला भकास बनवले आहे, असा आरोप चटप यांनी केला.

यावेळी जांबुवंतराव विचार मंचाच्या अध्यक्ष ज्वाला धोटे यांनी विदर्भासाठी संविधान हाती घ्यायला तयार असल्याचे सांगितले. विदर्भ महाजागरणचे नितीन रोंघे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात सर्वात कमी सिंचन अनुशेष भरल्याचा आरोप केला. नागविदर्भ आंदोलन समितीचे सरचिटणीस अहमद कादर यांनी विदर्भ संयुक्त कृती समितीतर्फे अधिवेशनावर ११ डिसेंबर रोजी १० हजार लोकांचा मोर्चा काढणा असल्याची माहिती दिली.

या पत्रपरिषदेला विदर्भ राज्य आंदोलन समितीचे पूर्व विदर्भ अध्यक्ष अरुण केदार, महिला आघाडी अध्यक्षा रंजना मामर्डे, युवा आघाडी अध्यक्ष मुकेश मासुरकर, ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर कोंडबत्तुनवार, कोअर कमेटीचे सदस्य तात्यासोहब मते, ज्योती खांडेकर, रेखा निमजे, आदी उपस्थित होते.

# डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाला नॅक चा 'अ' दर्जा



**दि.५विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाला नॅक या या संस्थेकडून ए (३.१९)दर्जा देऊन सन्मानित केले आहे.राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) द्वारा २१ व २२ नोव्हेंबर रोजी भेट देऊन महाविद्यालयातील सर्वच विभागाची पाहणी करण्यात आली. डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या सोयी सुविधा विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या बाबी ची तपासणी नॅक चामुच्या वतीने करण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व शैक्षणिक सुविधा महाविद्यालयात उपलब्ध असल्यामुळे हे महाविद्यालय वेगळे ठरले आहे. सामाजिक समस्या सोडविण्यासाठी देखील डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालयात विविध दालन उपलब्ध आहेत. नॅक कमिटी मध्ये चेअरमन म्हणून कर्नाटक विधी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.ईश्वरा भट यांच्यासोबत सदस्य म्हणून उत्तराखंड येथील विद्यापीठाच्या विधी विभागाचे प्रो. दिनेश कुमार भट्ट आणि तामिळनाडू येथील व्हीआयटी स्कूल वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे कुलसचिव व डीन प्रो. सुंदरा पंडियन यांचा सहभाग होता. नॅकच्या चमुने महाविद्यालयाला भेट देऊन सर्वच विभागाची पाहणी केली. अमरावती जिल्ह्यात एकमेव अनुदानित विधी महाविद्यालय असल्याने या ठिकाणी विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणात पसंती असते. प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांच्या नेतृत्वात सर्वच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेऊन महाविद्यालय सुसज्ज केले आहे. याचाच भाग म्हणून नॅक कमिटीने महाविद्यालयाला ए दर्जा देऊन सन्मानित केले आहे. महाविद्यालयाची ही तिसरी नॅक सायकल होती. डॉ. पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालयांमध्ये एलएलबी तीन वर्षीय अभ्यासक्रम, एलएलबी पाच वर्षीय अभ्यासक्रम तसेच पीएचडी रिसर्च सेंटर सह विविध कायदेविषयक सल्ला केंद्र सामाजिक समस्या निराकरण सेंटर उपलब्ध १९४६ खाली स्थापन झालेल्या हे महाविद्यालय झपाट्याने प्रगती करत आहे.श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व सर्व कार्यकारिणीने महाविद्यालयाचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे. डॉ.पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालयाने मिळवलेल्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# चक्रीवादळामुळे दक्षिणेकडून येणाऱ्या नागपूर मार्गे धावणाऱ्या ३५ हून अधिक रेल्वेगाड्या रद्द

**दि. ५ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

मिचाँग चक्रीवादळामुळे रेल्वेने ११४ गाड्या रद्द केल्या असून नागपूरमार्गे धावणाऱ्या ३५ हून अधिक रेल्वेगाड्यांचा त्यात समावेश आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने दक्षिण भारतात धडकलेल्या चक्रीवादळाने चेन्नईसह लगतच्या भागात हाहाकार उडवला आहे.



वादळाची आंध्र प्रदेशच्या दिशेने आगेकूच सुरू असून त्याचा विमानसेवेसोबतच रेल्वेसेवेलाही फटका बसला आहे. ७ डिसेंबरपर्यंत प्रवासाला सुरुवात होणाऱ्या गाडया स्थानकापासूनच रद्द राहतील.

दक्षिणेकडून येणाऱ्या आणि नागपूरमार्गे धावणाऱ्या गाड्यांमध्ये जीटी एक्स्प्रेस, केरला एक्स्प्रेस, तामिळनाडू एक्स्प्रेस, गोरखपूर एक्स्प्रेस, चेन्नई -छपरा-चेन्नई एक्स्प्रेस, चेन्नई- जयपूर- चेन्नई एक्स्प्रेस यासारख्या प्रमुख प्रवासी गाड्यांचा समावेश आहे.

# शरद पवार गटाचा जन आक्रोश मोर्चा...






अमरावतीच्या नेहरु मैदानापासून ते जिल्हाधिकारी कार्यालया पर्यंत मोर्चा काढण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, आमदार रोहित पवार,महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे उपस्थित होत्या शेतकरी, कामगार, विद्यार्थी, युवक तसेच सध्याच्या ज्वलंत प्रश्नांवर शरद पवार गट आक्रमक झाला आहे. अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा असल्याने पोलिसांचा कडक बंदोबस्त लावण्यात आला होता. मोर्चात राष्ट्रवादीचे नेते,कार्यकर्ते व शेतकरी,शेकडो ट्रॅक्टर घेऊन सहभागी झाले होते यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी स्वतःजिल्हाधिकारी कार्यालया पर्यंत टॅक्टर चालवीत नेला या वेळी राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी ही करण्यात आली.